घटकसंच 7

# शालेय शिक्षणातील पुढाकार

## रूपरेषा :

मानव संसाधनाचा विकासाचा गाभा म्हणजे शिक्षण. देशाची सामाजिक, आर्थिक स्थिती संतुलित राखण्यासाठी शिक्षण हे महत्त्वपूर्ण व साहाय्यभूत भूमिका बजावते. उत्तम नागरिक बनण्यासाठी, मुलांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी आणि उत्तम, दर्जेदार जीवन जगण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे. हे सर्व केवळ मूलभूत शिक्षणाचा पाया मजबूत करून साध्य करता येऊ शकते. हे ध्येय साध्य करण्यासाठी मानव संसाधन विकास मंत्रालय (MHRD) दोन विभागांमार्फत काम करते.

- शालेय शिक्षण व साक्षरता विभाग
- उच्च शिक्षण विभाग

शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाकडे देशातील शालेय शिक्षण विकासाची जबाबदारी आहे. जगातील उच्च शिक्षण व्यवस्थेच्या विकासामध्ये भारतातील उच्च शिक्षण विभागाचा क्रमांक अमेरिका व चीनच्या खालोखाल आहे. मानव संसाधन विकास मंत्रालय हे कार्य त्याच्या सहकारी संस्था जसे राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (NCERT), राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन आणि प्रशिक्षण संस्था (NIEPA), राष्ट्रीय मुक्त शिक्षण संस्था (NIOS) आणि राष्ट्रीय शिक्षण परिषद (NCTE) यांच्या सहकार्याने करते. मानव संसाधन विकास मंत्रालयाची कार्यव्याप्ती जरी विस्तृत असली तरी शालेय शिक्षण व साक्षरता विभागाने शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणाकरिता व शिक्षणाचा दर्जा सुधारण्याकरिता अलीकडे घेतलेल्या पुढाकाराबाबत या घटक संचाने प्रामुख्याने लक्ष केंद्रित केले आहे .

## अध्ययनाची उद्‌दिष्टे

या घटकसंचाचे अध्ययन केल्यानंतर अध्ययनार्थी खालील बाबी करण्यास समर्थ होतील.

- शालेय शिक्षणामध्ये सुरू असलेल्या विविध प्रक्रिया जसे PGI, UDISE इत्यादीचे शाळेमध्ये प्रभावी अंमलबजावणीबाबत शालेय शिक्षण व साक्षरता विभागाने अलीकडे घेतलेल्या पुढाकाराबाबत जागरुकता निर्माण होईल.
- शालेय शिक्षणाचा दर्जा सुधारण्याकरिता समग्र शिक्षा अभियानांतर्गत केलेल्या तरतुदींची उद्‌दिष्टे समजतील.
- ग्रंथालयातील पुस्तकांचा उपयोग करून वाचन सवयी विद्यार्थ्यांमध्ये विकसित करणे, शालेय क्रीडा स्पर्धा आयोजित करणे, परसबाग तयार करणे, युवा व पर्यावरण मंडळ स्थापन करणे, मुलांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याच्या संधी उपलब्ध करून देणे आणि आनंददायी अध्ययनाबाबत शाळेत पुढाकार घेतील.

## प्रस्तावना

1976 पूर्वी शिक्षण ही प्रामुख्याने राज्याची जबाबदारी होती. 1976 च्या घटना दुरुस्तीनुसार शिक्षणाचा समवर्ती सूचीमध्ये समावेश करण्यात येऊन एक महत्त्वाकांक्षी पाऊल उचलण्यात आले आहे. मूलभूत, आर्थिक आणि प्रशासकीय परिणामांची साध्यता होण्याकरिता केंद्र शासन व राज्य शासन यांची संयुक्त जबाबदारी असणे आवश्यक आहे. शिक्षणातील राज्याची भूमिका व जबाबदारी यात कुठलाही महत्त्वपूर्ण बदल झालेला नाही; पण देशातील शिक्षणाचे एकात्मीकरणाचे मजबुतीकरण करण्यासाठी, शिक्षणाचे सर्व स्तरावर दर्जा व

मानके राखण्यासाठी तसेच देशातील शैक्षणिक गरजांचा अभ्यास व पर्यवेक्षण करण्यासाठीची मोठी जबाबदारी केंद्र शासनाने घेतली आहे. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण यांकरिता त्याचप्रमाणे उच्च शिक्षणाला प्रोत्साहन देण्याकरिता भारत सरकारने केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत (CSS) अनेक उपक्रम व प्रकल्प सुरू केलेले आहे. (CSS) अंतर्गत अशा योजना आहेत की ज्यांची राज्य व केंद्रशासित प्रदेशाद्वारे अंमलबजावणी केली जाते. यासाठी राज्य सरकारचा विशिष्ट आर्थिक वाटा निश्चित करून मोठ्या प्रमाणात केंद्र शासनाकडून अनुदान उपलब्ध करून देण्यात येते. राष्ट्रातील संसाधनाच्या सुप्त गुणांना पूर्णतः चालना देण्यासाठी, शिक्षणाची समान संधी सर्वांना उपलब्ध करून देऊन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या तत्त्वाला अधीन राहून विविध केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीकरिता शासनाने एकात्मिक दृष्टिकोन स्वीकारला आहे.

### सामान्य उद्दिष्टे :

दर्जेदार शालेय शिक्षणाबरोबर इतर प्रवेशाच्या संधी वाढविणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, वंचित घटकांच्या समावेशित शिक्षणाद्वारे समता निर्माण करणे आणि शिक्षणाचा दर्जा सुधारणे ही शिक्षणाची सामान्य उद्दिष्टे आहेत.

समग्र शिक्षा अंतर्गत एकंदरीत शालेय शिक्षणाचा दर्जा उंचावण्याकरिता शालेय प्रशासकीय बाबी आणि शैक्षणिक कार्यक्रमात अध्ययन निष्पत्तीमध्ये सुधारणा करण्याकरिता मानव संसाधन विकास मंत्रालयाद्वारे नुकतेच अनेक नवीन उपक्रम हाती घेतले आहेत. PGI, UDISE, शगुनोत्सव, राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण या सर्व उपक्रमांची यशस्विता ही या उपक्रमांची सर्व स्तरावरील प्रभावी अंमलबजावणी सर्व स्तरावरील समन्वय आणि शाळा स्तरापासून तर राष्ट्रीय स्तरावर कार्यरत संस्थांमधील सुदृढ संबंधावर अवलंबून आहे.

### समग्र शिक्षा – शालेय शिक्षणाकरिता एकात्मिक योजना :

2018-19 मध्ये MHRD ने समग्र शिक्षा अभियानाची सुरुवात केली. शालेय शिक्षणाचा हा एक व्यापक कार्यक्रम असून यामध्ये पूर्व प्राथमिक ते बारावीपर्यंतच्या शिक्षणाचा समावेश केलेला आहे. शाळेची परिणामकारकता, अध्ययन निष्पत्ती चे समानता व शिक्षणाच्या संधीची समानता हे व्यापक उद्दिष्ट ठेवून हा कार्यक्रम सुरू केलेला आहे.

समग्र शिक्षा अभियानामध्ये यापूर्वीचे 3 कार्यक्रम सर्व शिक्षा अभियान (SSA), राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (RMSA) आणि शिक्षक शिक्षण (TEAB) यांचा समावेश केलेला आहे. या योजनेमध्ये प्रामुख्याने या प्रकल्पांच्या उद्दिष्टांमध्ये बदल करून राज्यांना शिक्षणाचा दर्जा सुधारण्याकरिता प्रेरित करणे तसेच शैक्षणिक व्यवस्थेच्या कार्याचा दर्जा सुधारणे आणि शालेय निकाल साध्यतेकडे लक्ष केंद्रित करणे या बाबींचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेमध्ये शाळा या संकल्पनेत पूर्व प्राथमिक, प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक या सर्व स्तरांचा एकत्रितपणे विचार केलेला आहे. शिक्षणाच्या शाश्वत विकासाकरिता पूर्व प्राथमिक व उच्च माध्यमिक स्तरावर शिक्षणाच्या हमीसह समावेशक समतामूलक दर्जेदार शिक्षण हे या योजनेचे उद्दिष्ट आहे.




या योजनेचे ध्येय शाश्वत विकासाचे ध्येय क्र–1 (SDGG-1) नुसार 2030 पर्यंत सर्व मुले आणि मुलींना समर्पक व प्रभावीपणे अध्ययन निष्पत्ती साध्य होणारे समतामूलक, दर्जेदार प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण करण्याची शिक्षण पूर्ण करण्याची ग्वाही देते. यापुढे शाश्वत विकासाचे ध्येय क्र–5 (SDGG-5) प्रतिपादन करते की, 2030 पर्यंत शिक्षणातून लिंगभेद दूर करणे, शिक्षणाच्या सर्व स्तरावर सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणे, दुर्बल, असुरक्षित घटक ज्या मध्ये दिव्यांग व्यक्तींना सामाजिक, सुरक्षित आणि प्रतिकूल परिस्थितीत राहणाऱ्या मुलांनाही व्यावसायिक प्रशिक्षणाची खात्री देते.

**चर्चा करू या**

- *शाश्वत विकासाचे उद्दिष्ट गाठण्याकरिता शिक्षणातून लिंगभेद नष्ट केल्याने कशी मदत होईल?*
- *तुमच्या शाळा/संस्थेमधून विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्याने यशस्वीरित्या शिक्षण पूर्ण केले याबाबत तुमच्या शाळा/संस्थेमधील सहकाऱ्यांशी संवाद साधा, चर्चा करा.*

## समग्र शिक्षा योजनेचे उद्दिष्ट :

- गुणवत्तापूर्ण शिक्षणाची तरतूद करणे आणि विद्यार्थ्यांच्या अध्ययन संपादणूकमध्ये वाढ करणे.
- शालेय शिक्षणातील सामाजिक आणि लिंगभेदाच्या अंतरात दुवा साधणे.
- शालेय शिक्षणाच्या सर्व पातळीवर/स्तरावर समता आणि समावेशित शिक्षणाची खात्री देणे.
- शालेय तरतुदींमध्ये किमान मानकांची खात्री देणे.
- व्यवसाय शिक्षणाला प्रोत्साहित करणे.
- 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, 2009 कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता राज्याला सहकार्य करणे.
- नोडल अधिकारी/संस्था म्हणून कार्य करणाऱ्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, राज्य शिक्षण संस्था आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांचे उच्चीकरण आणि सक्षमीकरण करणे.

## योजनेची वैशिष्ट्ये :

- दुर्गम भागातील शाळेचे उच्च माध्यमिक स्तरापर्यंत उच्चीकरण करून शालेय सुविधांचा विस्तार करून गुणवत्तापूर्ण शालेय शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करणे.
- शाळांना दिलेल्या नियमांचे पालन केले पाहिजे हे सुनिश्चित करण्यासाठी पुरेशा पायाभूत सुविधांची उपलब्धता सुनिश्चित करणे.
- ग्रंथालयाच्या बळकटीकरणासाठी प्रती शाळेत वार्षिक अनुदान रुपये पाच हजार ते वीस हजार रुपये देणे.
- संयुक्त शाळा अनुदान अंतर्गत शालेय पटनोंदणीच्या आधारे रुपये पंचवीस हजार ते दहा हजार पर्यंत मंजूर केले जाईल, त्यापैकी किमान 10% अनुदान स्वच्छता कृती योजनेवर खर्च करावा लागेल.
- क्रीडा उपकरणासाठी वार्षिक अनुदान प्राथमिक शाळांसाठी पाच हजार रुपये, उच्च प्राथमिक शाळांसाठी दहा हजार रुपये आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांसाठी पंचवीस हजार रुपये तरतूद.
- विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी प्रति विद्यार्थी प्रति वर्षी रु. 3,500/- (तीन हजार पाचशे) रुपयांची तरतूद यामध्ये इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतच्या विशेष गरजा असणाऱ्या मुलांना असणारा प्रति माह रुपये दोनशे विद्यावेतन समाविष्ट आहे.
- प्रतिविद्यार्थी प्रतिवर्ष गणवेश याकरिता रुपये सहाशे ची तरतूद.
- प्रतिविद्यार्थी प्रतिवर्ष पाठ्यपुस्तकाकरिता रु. 250/- to 400/- (रु. दोनशे पन्नास ते चारशे) तरतूद.
- कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय इयत्ता आठवी ऐवजी सहावी ते बारावीपर्यंत उच्चीकरण.
- शिक्षणाचा दर्जा सुधारण्याकरिता राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र, पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था या शिक्षकांना प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचे सक्षमीकरण.
- स्मार्ट क्लासरूम, डिजिटल बोर्ड आणि डीटीएच चॅनलद्वारा शिक्षणामध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वर्धित करणे.
- शिक्षण हक्क कायदा (RTE Act) अंतर्गत कलम 12 (1) ची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य व केंद्रशासित प्रदेशांना मदत करणे.

- प्रतिकूल परिस्थितीमध्ये जीवन जगणाऱ्या मुलांसाठी व अवघड क्षेत्रात राहणाऱ्या मुलांसाठी निवासी शाळा व वसतिगृह स्थापन करणे.
- संतुलित शैक्षणिक विकासात प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय गटांना (EBC, LWES), विशेष लक्ष केंद्रित जिल्हे, सीमा क्षेत्र आणि निती आयोगाने निश्चित केलेल्या 117 आकांक्षित जिल्ह्यांना प्राधान्य.

**चर्चा करू या**

- *समग्र शिक्षा अभियानाच्या वैशिष्ट्यानुसार समग्र शिक्षा या शिर्षकाचे तुम्ही कसे समर्थन कराल?*

या योजनेत प्रामुख्याने शिक्षक आणि तंत्रज्ञान (2Ts) (Teacher and Teachnogy) या दोन घटकांवर लक्ष केंद्रित करून शालेय शिक्षणाचा दर्जा सुधारण्यावर मुख्य भर दिलेला आहे. या योजनेचे मुख्य धोरण म्हणजे विविध उपक्रमाद्वारे शालेय शिक्षणातील सर्व स्तरावर अध्ययन निष्पत्तीमध्ये वाढ करणे. राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना त्यांच्या योजनांच्या निकषावर योजनांच्या प्राथमिकतेनुसार लवचिकता देण्याचा आणि या संदर्भातील एकूणच उपलब्ध संसाधने प्रस्तावित करण्याचा प्रस्ताव उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांची पट नोंदणी, वचनबद्ध दायित्व, अध्ययन निष्पत्ती आणि विविध कामगिरी दर्शकांना आधारभूत मानून निकषानुसार अनुदान प्रस्तावित केली जातील. ही योजना शालेय शिक्षणाच्या विविध स्तरांमधील संक्रमण दर सुधारण्यास आणि मुलांना प्रवेश मिळवून देण्यासाठी, सार्वत्रिक प्रवेशात मदत करण्यासाठी सहाय्य करेल. एकीकृत प्रशिक्षण दिनदर्शिका, शैक्षणिक क्षेत्रातील नवकल्पना, पर्यवेक्षण आणि मार्गदर्शक इत्यादीद्वारे विविध शालेय स्तरावर एकात्मिक शिक्षक शिक्षणाद्वारे परिणामकारक अभिसरण व दुवा साधला जाईल. ही एकमेव योजना देशातील सर्व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतील सर्व सेवा अंतर्गत कार्यक्रमांना गरजाधिष्ठित आणि गतिमान करून संचालन आणि पर्यवेक्षण करण्यासाठी नोडल एजन्सी बनण्यास सक्षम करेल. ही योजना देशातील सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेश व समाजातील सर्व स्तरांतील घटकांना तंत्रज्ञानाचा व दर्जेदार शिक्षणाचा फायदा घेण्यास सक्षम बनवेल.

## योजनेची अंमलबजावणी :

ही योजना केंद्र पुरस्कृत योजना म्हणून राज्य व केंद्रशासित प्रदेश स्तरावर एकल राज्य अंमलबजावणी संस्था (SIS) मार्फत राबविली जाते; राष्ट्रीय पातळीवर मानव संसाधन विकास मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय परिषद आणि शालेय शिक्षण व साक्षरता विभागाचे सचिव यांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्प मंजुरी मंडळ (PAB) आहे. प्रशासकीय परिषदेला प्रामुख्याने कार्यक्रमाचे निकष व आर्थिक तरतुदीमध्ये सुधारणा करण्याकरिता आणि या योजनेच्या एकंदरीत चौकटीत राहून अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचनांच्या मंजुरीकरिता सक्षम बनविले जाते. शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी विविध नावीन्यपूर्ण उपक्रम व कार्यक्रम यात समाविष्ट आहेत. भारतीय शैक्षणिक सल्लागार मर्यादित मधील तांत्रिक गट या विभागाला सहकार्य करतील. पूर्वीच्या सर्व शिक्षा अभियान व राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान व शिक्षक शिक्षण या योजनेमध्ये कार्य करणाऱ्या तांत्रिक सहकार्य गटाला (TSG) कार्यप्रवण क्षेत्रातील पट नोंदणी विषयक कामे, समता आणि दर्जेदार शिक्षण देण्याकरिता तांत्रिक सहकार्य करण्यासाठी समाविष्ट केले आहे. संपूर्ण शालेय शिक्षण विभागाकरिता एकात्मिक योजना राज्याकडे असावी अशी अपेक्षा केलेली आहे. या योजनेमध्ये निधी वाटपाचे प्रारूप केंद्र व राज्यांमध्ये सद्य:स्थितीत खालील प्रमाणे आहेत. जसे – अरुणाचल प्रदेश, आसाम, मणिपूर, मेघालय, मिझोरम, नागालँड, त्रिपुरा या आठ उत्तर–पूर्व राज्याकरिता तसेच जम्मू–काश्मीर, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड येथील हिमालयीन राज्यासाठी अनुदान वाटपाची गुणोत्तर हे 90:10 आहे. तर इतर सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेश यांकरिता हे प्रमाण 60:40 आहे. विधानसभा अस्तित्वात असलेल्या केंद्रशासित प्रदेशांकरिता शंभर टक्के अनुदान केंद्र शासनाद्वारे पुरविले जाईल. ऑक्टोबर, 2015 मध्ये केंद्र पुरस्कृत योजनाच्या सुसूत्रीकरणासाठी गठीत केलेल्या मुख्यमंत्र्यांच्या उपसमूहाने केलेल्या शिफारशीनुसार हे प्रमाण निश्चित केलेले आहे.

## योजनेचे घटक :

**शाळापूर्व शिक्षण** – समग्र शिक्षा अंमलबजावणी आराखड्यात शाळापूर्व शिक्षणाचे महत्त्व व गरज ओळखण्यात आली आहे. शालेय पूर्व शिक्षणामुळे केवळ शाळांमधील मुलांची प्रगतीच होत नाही तर भविष्यातील शिक्षण आणि विकासाचा पाया देखील मजबूत होतो. तसेच मुलांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन व शिकण्याची इच्छा देखील विकसित होते. त्यामुळे मुलांना पूर्व शालेय दर्जाचे अनुभव

देणे अत्यावश्यक आहे. समग्र शिक्षा अंतर्गत शाळापूर्व कार्यक्रम हा सद्य:स्थितीत सुरू असलेला 'पढ़े भारत, बढ़े भारत' या कार्यक्रमाचा महत्त्वपूर्ण घटक समजला जातो. या प्राथमिक शिक्षणाच्या सुरुवातीच्या इयत्तांमध्ये प्रारंभिक भाषा, अध्ययन साक्षरता आणि प्रारंभिक अंकज्ञान, संख्याज्ञान यावर लक्ष केंद्रीत केले आहे. त्यामुळे पूर्व प्राथमिक शिक्षण इयत्ता तिसरी पर्यंतच्या शिक्षणात एका गटात समाविष्ट केलेले आहे.

समग्र शिक्षा शाळांमधील पूर्व शालेय शिक्षण देण्यासाठी राज्य सरकारच्या प्रयत्नांना पाठिंबा देईल. याकरिता प्राथमिक शाळेच्या आवारात जिथे शक्य आहे तिथे अंगणवाडी सुरू करणे आणि महिला व बाल कल्याण मंत्रालयाच्या सहकार्याने अभ्यासक्रम विकसित करण्याकरिता सहकार्य केले जाईल. 4 ते 6 वर्षे वयोगटातील मुलांसाठी शाळा पूर्व कार्यक्रम हा दोन वर्ष कालावधीचा असेल. 2015-16 च्या यु-डायस माहितीप्रमाणे 41.3% टक्के शासकीय प्राथमिक शाळांच्या परिसरात अंगणवाडी केंद्रे आहेत. शाळा परिसरात असलेल्या अंगणवाडीमध्ये 3 ते 6 वर्षे वयोगटातील मुले समाविष्ट केल्या जातात. त्यातील वय वर्षे 4 ते 6 वयोगटातील मुले ही शाळापूर्व शिक्षणासाठी पात्र समजले जातील. सन 2016-17 च्या UDISE माहितीप्रमाणे 12.36 लाख प्राथमिक विभागासह असलेल्या शाळांपैकी 2.94 लाख शाळांचे प्रमाण 24% आहे. या शाळांमध्ये प्राथमिक विभाग कार्यरत आहे. 1.36 कोटी मुलांची पूर्व प्राथमिक शिक्षणाकरिता पटनोंदणी केली जाते. त्यापैकी केवळ 0.36 कोटी पटनोंदणी शासकीय शाळांमध्ये आहे. जिथे राज्यशासन अधिकृत प्राथमिक शाळेत शाळापूर्व शिक्षण पुरविण्यास इच्छुक असेल; तिथे या योजनेअंतर्गत सहकार्य करण्यात येईल. या योजनेने सुरक्षित पायाभूत सुविधांकरिता मार्गदर्शक तत्त्वे तयार केली आहेत. ज्यात स्वच्छताविषयक सोयीसुविधा, योग्य अभ्यासक्रम विकसन, अध्ययन कृती, अध्यापन शास्त्रीय कृती आणि मूल्यमापन, शिक्षकांचा व्यावसायिक विकास व समाज सहभाग व प्रतिबद्धता इत्यादींचा समावेश आहे. ही योजना प्रामुख्याने महिला व बालकल्याण विकास मंत्रालयाशी समन्वय ठेवून अभ्यासक्रम विकसन अंगणवाडीताई क्षमता विकसन व मार्गदर्शन व शालेय मुख्याध्यापक आणि शिक्षकाद्‌वारे सहाय्य आणि अध्ययन साहित्य विकसन इत्यादी बाबींवर भर देते. पूर्व प्राथमिक शाळांच्या सक्षमीकरणाकरिता राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना प्रती शाळा तीन लाख रुपये अनुदान पुरविले जाते.

> शालेय शिक्षणाची एकूण गुणवत्ता सुधारण्यासाठी पूर्वशाळा शिक्षण का महत्त्वपूर्ण बनत आहे? आपल्या राज्यात केंद्रशासित प्रदेशात पूर्व शाळा शिक्षण अंमलबजावणीची कोणती आव्हाने आहेत?

**विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय रुजविणे :** समग्र शिक्षा अंतर्गत ग्रंथालय अनुदान (पढ़े भारत बढ़े भारत)

सन 2018-19 मध्ये नव्याने सुरू झालेल्या केंद्र पुरस्कृत समग्र शिक्षा अंतर्गत सर्व स्तरांवरील सर्व विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय विकसित करणे, शासकीय शाळांना ग्रंथालय अनुदान पुरवून शालेय ग्रंथालयांचे सक्षमीकरण करणे, इत्यादी उपक्रमाद्‌वारे 'पढ़े भारत, बढ़े भारत' या कार्यक्रमातील कृतींची पूर्तता करणे. राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण 2017 च्या निष्कर्षानुसार पुस्तक वाचनामुळे मुलांच्या संपादणुकीमध्ये वाढ होते. प्रथमच प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळांकरिता स्वतंत्रपणे वार्षिक ग्रंथालय अनुदानाची तरतूद मंजूर करण्यात आली आहे. प्राथमिक शाळा ते माध्यमिक शाळांकरिता ग्रंथालय अनुदान रक्कम 5000 ते 10000 रुपये पर्यंतची तरतूद करण्यात आली आहे.

1. प्राथमिक शाळांना रक्कम रुपये 5000 पर्यंत व उच्च प्राथमिक शाळांना रुपये 10 हजार पर्यंत.
2. संयुक्त प्राथमिक शाळा (इयत्ता 1 ते 8 वी ) करिता रक्कम रुपये 13 हजार पर्यंत.
3. माध्यमिक शाळा (इयत्ता 9 वी व 10 वी) करिता रक्कम 10 हजार रुपये पर्यंत.
4. इयत्ता (6 वी ते 12 वी) करिता रक्कम रुपये 15 हजार पर्यंत.
5. संयुक्त माध्यमिक शाळांत (इयत्ता 1 ली ते 10 वी) करिता रुपये 15 हजार पर्यंत.
6. संयुक्त माध्यमिक शाळा (इयत्ता 9 वी ते 12 वी) करिता रुपये 15 हजार पर्यंत.

**कृती**

प्रत्येक अध्ययनार्थीला तयार करायला सांगा.

1. मागील पाच वर्षात त्यांनी/तिने वाचलेल्या पुस्तकांची यादी.
2. त्याच्या/तिच्या मते मुलांना आवडणाऱ्या पुस्तकांची यादी. ही यादी भिंतीवर चार्ट पेपरवर चिकटवा आणि प्रत्येकाला त्याच्या शाळेतील ग्रंथालयासाठी आणि मुलांसाठीच्या पुस्तकाचे ग्रंथापालांकडे संकलन करण्यासाठी सांगा.

7. उच्च माध्यमिक फक्त (11 वी व 12 वी) करिता रुपये 11 हजार पर्यंत.
8. संयुक्त उच्च माध्यमिक शाळांत (इयत्ता 1 ली ते 12 वी) करिता रक्कम वीस हजार रुपयांपर्यंत.
9. ही अनुदाने वार्षिक उपलब्ध होतील.

'पढ़े भारत बढ़े भारत' या कार्यक्रमांतर्गत समजपूर्वक वाचनाच्या प्रक्रियेचे सुलभीकरण करण्यासाठी ग्रंथालय संसाधनाचा उपयोग केला गेलेला आहे. प्राथमिक स्तरापासून उच्च माध्यमिक स्तरापर्यंत वाचन प्रक्रियेकरिता सातत्यपूर्ण सरावाची गरज असते. ग्रंथालयाच्या विकास आणि समृद्धीकरिता वेळोवेळी अद्ययावत पुस्तकांची भर जसे नियतकालिके, मासिके इत्यादी वाचनाच्या साहित्याची आवश्यकता असते.





## समग्र शिक्षा अंतर्गत क्रीडा अनुदान - (खेले इंडिया खिले इंडिया)

शालेय क्रीडांचा विद्यार्थी आणि शैक्षणिक व्यवस्था या दोघांनाही महत्त्वाचा फायदा होतो. खेळ हे मुलांच्या शारीरिक, भावनिक, सामाजिक, बोधात्मक घटकांच्या विकासाला मदत करते. मुलांमध्ये सामाजिक कौशल्य, सामाजिक वर्तन, जीवनशैली, आत्मसन्मान आणि शाळेची आवड इत्यादी गोष्टींना आकार देण्याकरिता खेळ महत्त्वपूर्ण योगदान देते. खेळाचे अनेक फायदे आहेत. खेळातील शारीरिक कृती, व्यायाम, मन व शरीराच्या एकात्मिक विकासास सहाय्य करते. तसेच शरीर स्वास्थ्याकरिता एरोबिक आणि अनोरोबिक शारीरिक सरावाची समज विकसित करते आणि आत्मविश्वास वाढविते.





खेळ हे समाजातील विविध भूमिका निभावण्याकरिता, सामाजिक कौशल्य शिकण्याकरिता जसे – सहनशीलता, इतरांचा आदर आणि सांघिक उद्दिष्टपूर्तीसाठी तडजोड, सहकार्य, सलगता इत्यादी बार्बी शिकण्याकरिता मदत करतात तसेच इतर लोकांना भेटण्याचा व संवादाच्या संधी उपलब्ध करून देतात. व्यक्तीला भावनिक, मानसिकदृष्ट्या सक्षम बनवितात. खेळ व क्रीडा प्रकारांमध्ये सहभागाच्या संधी उपलब्ध करून देऊन मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने समग्र शिक्षा अंतर्गत प्रथमतः क्रीडा साधनांकरिता अनुदानाची तरतूद केलेली आहे. प्रत्येक शासकीय शाळेला इनडोअर व आउटडोअर क्रीडा साहित्याचा खर्च भागवण्याकरिता प्राथमिक शाळेला रुपये 5 हजार रुपये, उच्च प्राथमिक शाळेला 10 हजार रुपये व  माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेला 25 हजार रुपयांपर्यंत क्रीडा अनुदान मिळते.

## संयुक्त शाळा अनुदान :

सदर योजनेअंतर्गत सर्व शासकीय शाळांना पुढील कामाकरिता वार्षिक अनुदान मंजूर केले जाईल जसे – शाळेतील नादुरुस्त उपकरणे बदलण्याकरिता, क्रीडा साहित्याची देखभाल, क्रीडा साहित्य प्रयोगशाळा, वीज देयके, इंटरनेट शुल्क, पाणी, शैक्षणिक साहित्य इत्यादी. संयुक्त शाळा अनुदानाची वार्षिक रक्कम रुपये 25 हजार ते 1 लाखापर्यंत वेगवेगळी आहे. खाली दिलेल्या तक्त्यावरून विद्यार्थी संख्येच्या आधारे ही रक्कम कशा प्रकारे वितरित होईल हे स्पष्ट होते.

| शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या | शाळा अनुदान |
|---|---|
| < 100 | रुपये 25,000 स्वच्छता कृती योजनेकरिता किमान 2,500 खर्चाच्या तरतुदीसह |
| > 100 to < 250 | रुपये 50,000 स्वच्छता कृती योजनेकरिता किमान 5,000 खर्चाच्या तरतुदीसह |
| > 250 to < 1000 | रुपये 75,000 स्वच्छता कृती योजनेकरिता किमान 7,500 खर्चाच्या तरतुदीसह |
| > 1000 | रुपये 1,00,000 स्वच्छता कृती योजनेकरिता किमान 10,000 खर्चाच्या तरतुदीसह |

## सर्व मुलांची अध्ययन निष्पत्ती व्हावी यासाठीची अध्यापन पद्धती :

यापूर्वीच्या सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार, अधिनियम 2009 इत्यादी योजनांमध्ये विशेष गरजा असणाऱ्या बालकांसाठी समावेशित शिक्षण हा अत्यंत महत्त्वाचा उपक्रम सुरू केलेला आहे. सन 2018-19 पासून समग्र शिक्षा अंतर्गत विशेष गरजा असणाऱ्या बालकांच्या शिक्षणासह सर्व विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यावर भर दिला आहे. समग्र शिक्षा अंतर्गत हा उपक्रम/कार्यक्रम एक अत्यंत आवश्यक घटक आहे. समावेशित शिक्षणांतर्गत विद्यार्थिभिमुख अनेक कृतींना व कार्यक्रमांना सहकार्य पुरविले आहे. ज्यात विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांची ओळख व मूल्यमापन, साहित्यांची व उपकरणांची तरतूद, शस्त्रक्रिया, ब्रेल लिपीतील पुस्तके, ठळक अक्षरातील पुस्तके, थेरपी सुविधा, अध्ययन अध्यापनाकरिता शैक्षणिक साहित्य विकसन, सहाय्यक उपकरणे, विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गरजा व त्यांचे स्वरूपाबाबत






> *GHS-54 इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाच्या खुणांच्या भाषेद्वारे नमुना अध्यापन पाठ. पुस्तकाचे नाव–डोन्ट अफ्रेड ऑफ डार्क, हेलन केलर*

सकारात्मक दृष्टिकोन आणि जाणीव निर्माण करण्याकरिता वातावरण निर्मिती, उदबोधन कार्यक्रम, सूचना साहित्याची खरेदी किंवा अभ्यासक्रम समायोजनाबाबत विशेष शिक्षक आणि सामान्य शिक्षकांचे सेवांतर्गत प्रशिक्षण विशेष गरजा असणाऱ्या मुलींकरिता विद्यावेतन इत्यादी उपक्रमांचा समावेश आहे.

विशेष गरजा असणाऱ्या बालकांकरिता (वयोगट 6 ते 14 वर्षे), 'बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार, अधिनियम 2009' अन्वये अंमलबजावणी होण्याकरिता यात विशेष भर दिला आहे. सद्य:स्थितीत इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतच्या विशेष गरजा असणाऱ्या सर्व बालकांवर समग्र शिक्षा योजनेत लक्ष केंद्रित केले आहे. हेच लाभ हस्तांतरण DBT अंतर्गत इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतच्या विशेष गरजा असणाऱ्या मुलींना प्रतिमहा 200 रुपये विद्यावेतन दिले जाईल. यापुढे ही सुविधा केवळ नववी ते बारावीपर्यंत असेल. विशेष गरजा असणाऱ्या बालकांकारिता असलेली वार्षिक तरतूद प्रती विद्यार्थी रुपये 3000 ते 3500 पर्यंत वृद्धिंगत केलेली आहे. या व्यतिरिक्त शाळेत असणाऱ्या विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या गरजा ओळखण्याकरिता स्वतंत्र संशोधन सहाय्य (विशेष शिक्षण साधन व्यक्तींच्या वेतनाकरिता आर्थिक सहाय्य) सुद्धा उपलब्ध करून दिलेले आहे.

## कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय :

समग्र शिक्षा योजनेचे महत्त्वाच्या उद्दिष्टांपैकी एक उद्दिष्ट म्हणजे शालेय शिक्षणाच्या सर्व स्तरावर लिंगभेद व सामाजिक संवर्गातील दरी दूर करणे होय. परिणामी मुलींचा शिक्षणातील सहभाग वाढविण्याकरिता या योजने अंतर्गत इयत्ता बारावीपर्यंत निवासी आणि शैक्षणिक सुविधा पुरविण्याकरिता सध्या अस्तित्वात असलेल्या कस्तुरबा गांधी विद्यालयाचे उच्च प्राथमिक आणि माध्यमिक स्तरावरील मुलींच्या वसतिगृहाचा विस्तार केला आहे.

अनुसूचित जाती, जमाती, इतर मागास वर्ग, अल्पसंख्याक समुदाय आणि आर्थिकदृष्ट्या मागास (BPL) कुटुंबातील 14 ते 18 वर्षे वयोगटातील इयत्ता 6 वी ते 12 वी पर्यंत शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मुलींना दर्जेदार शिक्षणाची हमी देऊन प्राथमिक स्तरापासून ते माध्यमिक स्तरापर्यंत आणि शक्य असेल तिथे उच्च माध्यमिक स्तरापर्यंत मुलींच्या शिक्षणाचे सुलभ संक्रमण होण्याची हमी ही योजना देते.

सध्या अस्तित्वात असलेल्या उच्च प्राथमिक स्तरावरील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाचे इयत्ता बारावीपर्यंतचे उच्चीकरण करण्याची समग्र शिक्षा योजनेत तरतूद आहे. इतर कोणत्याही योजनेअंतर्गत निवासी शाळा उपलब्ध नसल्याने व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या तालुक्यात इयत्ता सहावी ते बारावीपर्यंतच्या मुलींकरिता किमान एका निवासी शाळेची सुविधा पुरविली जाईल. या योजनेतील लक्ष गट म्हणजे अनुसूचित जाती, जमाती, इतर मागास वर्ग, अल्पसंख्यांक समुदाय, इतर आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय कुटुंबातील इयत्ता सहावी ते बारावीपर्यंतचे शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या 10 ते 18 वयोगटातील मुली होय. इमारती बांधकामाकरिता अनावर्ती अनुदान व्यतिरिक्त समग्र शिक्षा खालीलप्रमाणे मनुष्यबळ खर्चासह इतर खर्च भागविण्याकरिता खालील प्रमाणे आवर्ती अनुदान उपलब्ध करून देते.

- कस्तुरबा गांधी विद्यालयातील इयत्ता सहावी ते आठवीकरिता वार्षिक 60 लाख रुपयांपर्यंत.
- कस्तुरबा गांधी विद्यालयातील इयत्ता सहावी ते दहावीकरिता वार्षिक 80 लाख रुपयांपर्यंत.
- कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील इयत्ता सहावी ते बारावीपर्यंत वार्षिक एक कोटी रुपयांपर्यंत.
- केवळ मुलींच्या वसतिगृहातील इयत्ता नववी ते बारावीकरिता रुपये वार्षिक 25 लाखापर्यंत.

सद्य:स्थिती 2018-19 पर्यंत मंजूर असलेल्या एकूण 5970 कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय यापैकी 4841 कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय कार्यरत आहे आणि 5.91 लाख मुलींचे सद्य:स्थितीत कस्तुरबा गांधी विद्यालयामध्ये नोंदणी झालेली आहे. सन 2018-19 च्या दरम्यान नवीन 35 कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय यांना मंजुरी मिळालेली आहे. सन 2018-19 मध्ये 1232 कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील इयत्ता 6 ते 10/12 वी पर्यंतचे उच्चीकरण झालेले आहे.

## स्व-संरक्षण प्रशिक्षण (रक्षा) :




देशातील कुमारवयीन मुलींच्या शिक्षण वाढ, विकास, आरोग्यावर परिणाम करणारे गंभीर समस्या म्हणजे लिंगाधारित हिंसाचार होय. राष्ट्रीय गुन्हे नोंद कार्यालयाने सादर केलेल्या भारतातील गुन्ह्यांच्या अहवालानुसार मागील काही वर्षात लिंगाधारित गुन्ह्यांमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. दुर्दैवाने नोंद न केलेल्या गुन्ह्यांची माहिती उपलब्ध नाही. देशात मुलींच्या बाबतीत घडणाऱ्या गुन्ह्यांची संख्या लक्षात घेता मुलींच्या सुरक्षिततेची हमी देण्याकरिता शाळेतच त्यांना स्व-संरक्षणाचे प्रशिक्षण धडे देणे महत्त्वाचे आहे. स्व-संरक्षण प्रशिक्षण हे एक जीवन कौशल्य आहे. त्यामुळे सभोवतालच्या परिसराबाबत अधिक जागरुक राहण्यात आणि अकल्पित घडणाऱ्या प्रसंगांना तोंड देण्यास तयार राहण्याकरिता मदत होते. स्व-संरक्षण प्रशिक्षणातून मुलींना तणावाच्या वेळी मानसिकदृष्ट्या, शारीरिकदृष्ट्या, बौद्धिकदृष्ट्या सक्षम राहून स्वतःचे संरक्षण करण्यास शिकविले जाते. स्व-संरक्षण प्रशिक्षणाचे तंत्र मुलींमध्ये आत्मविश्वास वाढविते आणि विशेष करून मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहित करते. विशेषतः त्यांच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील संक्रमणाला आणि शाळेतून मुलींच्या गळतीचा दर कमी होण्यास मदत होते.

स्व-संरक्षण तंत्राद्वारे मुलींना आत्मबल वाढविण्यास शिकविले जाते. संकट प्रसंगी स्वतःलाच वाचविण्याकरिता मार्शल आर्ट प्रशिक्षणाची गरज नाही. त्याऐवजी धोरणात्मक ढकल, हलका प्रहार, लाथा व बुक्कीने प्रहार करून आक्रमणकर्त्याचा प्रतिबंध केला जाऊ शकतो. मुलींना त्यांच्या दैनंदिन वापरातील वस्तूंचे उदा. किल्ली, दुपट्टा, ओढणी, मफलर, नोटबुक इत्यादी वस्तूंचा शस्त्राप्रमाणे संरक्षणाकरिता उपयोग करून व संरक्षण करण्याचे प्रशिक्षण दिले जाते.

समग्र शिक्षा अंतर्गत मुलींची पटनोंदणी असलेल्या प्रत्येक शासकीय शाळेत रुपये 3000 प्रतिमहाप्रमाणे तीन महिन्यासाठी स्व-संरक्षण प्रशिक्षण पुरविले जाते. इयत्ता सहावी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थिनींकरीता हे प्रशिक्षण तयार केलेले आहे. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात निवासी राहणाऱ्या मुलींना सुद्धा हे प्रशिक्षण दिले जाते. भारत सरकारच्या महिला व बालकल्याण विकास मंत्रालया अंतर्गत निर्भया फंड, पोलीस विभाग, गृहरक्षक दल, राष्ट्रीय छात्र सेना किंवा राज्य सरकारच्या इतर योजनेअंतर्गत व केंद्रशासित प्रदेशांनी संरक्षण प्रशिक्षणाकरिता अनुदान उपलब्ध करून देण्याची काळजी घ्यावी.

## शालेय सुरक्षा :

मुलांना सुरक्षित वाढ व विकासाला पोषक अशा शालेय वातावरणात प्रवेश मिळविण्याचा व स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार आहे. शालेय सुरक्षितता ही केवळ पायाभूत सुविधा आणि शारीरिक सुरक्षितता म्हणून पाहिली जात नाही, तर ती एक व्यापक दृष्टीने पाहिले जाते. शारीरिक शिक्षा ते गुंडगिरी, शारीरिक हिंसा, लैंगिक, मानसिक, भावनिक हिंसा काही घटकांमध्ये मृत्यूची संभाव्यता इत्यादी बाबींमुळे शालेय सुरक्षिततेचा मुद्दा अधिक गुंतागुंतीचा झालेला आहे. गेल्या काही काळात खून, हल्ला, बलात्कार इत्यादींसारख्या हिंसा आणि दुर्दैवी घटनांचे अहवाल प्राप्त झालेले आहे.

हिंसा, गुन्हेगारी, अश्लिल साहित्य आणि मादक द्रव्यांचा गैरवापर दाखविणाऱ्या इंटरनेट आणि व्हिडिओ सहज उपलब्ध आहेत. मादक द्रव्य, अल्कोहोल, सिगारेट इत्यादींची सहज उपलब्धता देखील वाढली आहे. त्याच वेळी पालक, शिक्षक आणि सहाध्यायीकडून दिल्या जाणाऱ्या परीक्षेच्या ताणाचे पर्यवसन हे निराशा, आक्रमकता आणि काही बाबतीत आत्महत्येत होतो. शाळा व्यवस्थापन, मुख्याध्यापक व शिक्षक, कर्मचारी यांचा दृष्टिकोन साधारणपणे उदासीन असतात. हे चिंतेचे मुख्य कारण असल्याने शाळेची सुरक्षा आणि सुरक्षा चौकट आणि कृती योजनेची मागणी होत आहे. शालेय सुरक्षेकरिता शाळा व्यवस्थापन, शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि सल्लागार यांच्यासह जबाबदारीच्या चौकटीसह सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्त्व तयार केले गेले आहे.

***जागो बदलो बोलो***

*तेलंगणाच्या राज्य शिक्षण विभागाने बाल लैंगिक अत्याचाराविरुद्ध 'जागो बदलो बोलो'ची मोहीम पोलीस विभागाच्या सहकार्याने (POCSO) कायद्यांतर्गत राबविली आहे. या मोहिमेअंतर्गत मुख्याध्यापक व शिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित केले.*

आदर्श परिस्थितीमध्ये, प्रत्येक शाळेमध्ये एक समुपदेशक पुरविला जावा; परंतु सध्या परिस्थितीमध्ये आपल्या देशात प्रशिक्षित समुपदेशकाची कमतरता असल्यामुळे शाळेतून शिक्षकांना हे कार्य करण्यासाठी प्रथम समुपदेशक म्हणून प्रेरित केले जाऊ शकते. विद्यार्थ्यांकडून होणाऱ्या गैरवर्तनाची व विचलित करणाऱ्या लक्षणाची ओळख करण्यासाठी शिक्षक व मुख्याध्यापकाचे उद्‌बोधन व्हावे आणि त्याद्‌वारे विद्यार्थ्यांना समुपदेशन करावे. या एकात्मिक शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत शिक्षकांना पुढील प्रमाणे उद्‌बोधन करण्यात येईल. जसे समुपदेशन (POCSO) कायद्या अंतर्गतच्या तरतुदी, जेजे कायदा, शालेय सुरक्षितता मार्गदर्शक सूचना, हेल्पलाईन, आकस्मिक नंबर, तक्रारपेटी इत्यादी उद्‌दिष्टांकरिता सर्व शाळेत इयत्ता पहिली ते बारावीकरिता प्रति शिक्षक एक हजार रुपयांची तरतूद केली जात आहे. प्रत्येक शाळेत सुरक्षा फलक दर्शनी भागात लावणे आवश्यक आहे. ज्यामध्ये पुढील बाबींचा समावेश असावा आकस्मिक नंबर, संबंधित व्यक्तींचे संपर्क नंबर याचा समावेश असेल. हा फलक तयार करण्याकरिता प्रती शाळा पाचशे रुपये पुरविले जात आहे.

## रंगोत्सव :

मानव संसाधन विकास मंत्रालयाने देशातील युवा अध्ययनार्थींमध्ये सांस्कृतिक विविधतेविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी पुढाकार घेऊन हा कार्यक्रम तयार केलेला आहे. रंगोत्सवा अंतर्गत सांस्कृतिक कृती व प्रसंगांचे संकलन केले होते. संपूर्ण देशभरातील शाळांनी या कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला होता.

त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याला विविध संस्कृतीमधील अप्रतिम सौंदर्याचा अनुभव घेता आला. विद्यार्थी, शिक्षक आणि इतर सर्व भागीदारांना त्यांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने निष्पक्ष व्यासपीठ उपलब्ध करून देण्याकरिता दिनांक 7 ते 21 डिसेंबर, 2018 या कालावधीत 'रंगोत्सव, एक सांस्कृतिक पंधरवाडा'चे आयोजन करण्यात आले होते. रंगोत्सव याचे मुख्य उद्‌दिष्ट पुढीलप्रमाणे होते.

- कला आणि संस्कृतीच्या विविध क्रियाकल्पा द्‌वारे शाळेच्या वातावरणाला एक दोलायमान/गतिमान आणि आनंददायी पद्‌धतीने शिकण्याच्या जागेत परिवर्तित करणे. विद्यार्थी, शिक्षक व इतर कर्मचारी सदस्यांसह शालेय समुदायातील प्रत्येक सदस्यांची कलात्मक प्रतिभा आणि सर्जनशीलता साजरे करण्यासाठी एक योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देणे.
- विविधतेने नटलेल्या भारताच्या समृद्ध, सांस्कृतिक वारसाचे प्रदर्शन करून त्याचा उत्साह साजरा करणे. देशातील सांस्कृतिक, भौगोलिक, भाषा, अन्न आणि चालीरिती यातील विविधता समजून घेण्यासाठी व त्यांचा अभिमान बाळगण्यासाठी सर्व बालकांना वयानुरूप अभिव्यक्तीच्या संधी उपलब्ध करून देणे.
- 'एक भारत, श्रेष्ठ भारत' हे ध्येय गाठण्याकरिता नियोजित उपक्रमांच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेला प्रोत्साहन देणे.
- शाळेत आनंददायी अध्ययन वातावरण निर्मितीला चालना देण्याकरिता संपूर्ण सत्रात दररोज शालेय नित्यक्रमात (रंगोत्सवानंतरही) कला एकत्रित करण्याचा नियमित सराव करणे.
- रंगोत्सवाला मिळालेला प्रतिसाद हा अमाप व निश्चितच स्वागतार्ह होता. संपूर्ण देशभरातून शाळांनी विद्यार्थी व शिक्षकांसाठी सांस्कृतिक प्रवेशद्‌वार उघडण्याकरिता खूप प्रयत्न केले. परिणाम स्वरूप संपूर्ण देशभरात कलात्मक प्रतिभेचा उत्सव साजरा झाला.
- भाषा संगम आणि इतर शाळा स्तरावरील उपक्रमाव्यतिरिक्त राष्ट्रीय बालसभा आणि एकात्मिक शिबिर, राष्ट्रीय स्तरावरील लोकनृत्य, राष्ट्रीय स्तरावरील भूमिका अभिनय, कला उत्सव, संगीत कला संगम आणि आंतरशालेय बँड स्पर्धा इत्यादी उपक्रम प्रादेशिक, राज्य व विभागीय तसेच राष्ट्रीय स्तरावर रंगोत्सवाचा भाग म्हणून आयोजित होते.

## शाळास्तरीय मूल्यांकन (वार्षिक संपादणूक सर्वेक्षण) :

अध्ययन निष्पत्तीचे/संपादणुकीचे निष्पक्ष मूल्यांकन करण्यासाठी या विभागाने राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षणाची प्रक्रिया सुरू केलेली आहे. बाह्य मूल्यमापनाचे हे कार्य ठराविक अंतराने करण्यात आलेले आहे. सर्व भागधारकांसोबत सविस्तर आणि सूक्ष्म आंतरक्रिया/चर्चा करून हे मूल्यमापन प्रक्रिया विकसित केले आहे. सन 2017-18 मध्ये आयोजित NAS चा निकाल सार्वजनिकरित्या उपलब्ध आहे.

पुढे सन 2017 मध्ये पार पडलेल्या NAS मधील 2.2 दशलक्ष विद्यार्थ्यांच्या सर्वेक्षणातून मिळालेल्या पुराव्याच्या आधारे आणि अध्ययन संपादणूक सुधारण्याकरिता तयार करावयाच्या आराखड्यासाठी एनसीईआरटीने पथदर्शी कार्यक्रमांतर्गत त्यानंतर लगेचच केलेल्या सर्वेक्षणावरून सन २०१९ मध्ये प्राथमिक स्तरावरील सर्व बालकांचे अध्ययन संपादणुकीचे मूल्यमापन करण्याकरिता शाळास्तरीय मूल्यांकन सर्वेक्षण आयोजित करण्याचे निश्चित केले आहे. संबंधित शाळांद्वारे केले जाणारे हे मूल्यांकन म्हणजे विद्यार्थ्यांचे दर्जेदार व भयमुक्त मूल्यांकन प्रक्रिया असेल निश्चित केलेल्या अध्ययन संपादणुकीपर्यंत पोहचण्याकरिता बाह्य मूल्यमापनाच्या अनुषंगाने गुणात्मक व परिणामात्मक मूल्यमापनाचे तंत्र आवश्यक आहे. हे दोन्ही मूल्यमापने तार्किक सातत्य निर्माण करण्याकरिता आवश्यक आहे.

## युवा मंच व पर्यावरण पूरक मंचाची स्थापना :

युवामंच हे जीवन कौशल्य विकसित करण्याचे, स्वाभिमान निर्मितीचे, आत्मविश्वास वाढविण्याचे, तणाव, लज्जा आणि भीती यांसारख्या नकारात्मक भावनांचा प्रतिकार करण्याचे एक साधन आहे.

शाळांमधील पर्यावरण पूरक मंच हा विद्यार्थ्यांना अर्थपूर्ण पर्यावरणात्मक वृत्ती आणि प्रकल्पांमध्ये सहभाग घेण्यास सक्षम बनवितात. हे एक व्यासपीठ आहे ज्या माध्यमातून विद्यार्थी त्यांचे पालक आणि सभोवतालच्या समुदायावर प्रभाव पाडून त्यांना पर्यावरणपूरक वर्तन करण्यास प्रेरित करतात. पाठ्यक्रम अभ्यासक्रमाच्या मर्यादेच्या पलीकडे जाऊन हा पर्यावरणपूरक मंच विद्यार्थ्यांना पर्यावरणीय संकल्पना आणि कृती जाणून घेण्यासाठी सक्षम बनवेल. या सर्व बाबी लक्षात घेता गुण आणि पर्यावरणपूरक मंच विद्यार्थ्यांकरिता स्थापन करतील; जेथे शाळेच्या वेळेनंतर आणि सुट्टीच्या कालावधीत विद्यार्थी वादविवाद, संगीत, कला, वाचन संस्कृती इत्यादींमध्ये सहभाग घेऊ शकतील. यामुळे विशेषतः शालेय खेळ, क्रीडा उपकरणे आणि ग्रंथालयातून आदर्श शालेय पायाभूत सुविधांचा उपयोग करण्यास मदत मिळेल. त्यायोगे विद्यार्थ्यांचा छंद, कौशल्य आणि रुची वाढण्यास मदत होईल. जर अशा प्रकारे स्थापन झाले नाही तर मुलं अभिव्यक्त होऊ शकणार नाही.

प्राथमिक स्तरावर युवा आणि पर्यावरणपूरक मंच याकरिता प्रतिशाळा प्रतिवर्ष रुपये 15 हजार आर्थिक तरतूद केली जात आहे आणि माध्यमिक स्तरावर प्रति वर्षी प्रति शाळा 25 हजारांची तरतूद केली जात आहे.

## वाहतूक व मदतनीस सुविधा :

विशेष गरजा असणाऱ्या मुलांना आणि इयत्ता पहिली ते आठवीच्या मुलांना प्राथमिक शाळेत पोहोचण्याकरिता वाहतूक व मदतनीस सुविधा उपलब्ध आहे. ही सुविधा उपलब्ध करून दिली नाही तर विरळ लोकसंख्या असलेल्या भागातील मुलांना, जमिनीची समस्या असलेल्या शहरी भागातील मुलांना, आत्यंतिक वंचित गटातील मुलांना आणि विशेष गरजा असलेल्या बालकांना शाळेत जाता येणे/उपस्थित रहाणे कठीण झाले असते.

राज्याच्या प्रचलित नियमानुसार शहरी भागात जिथे जमीन उपलब्ध नसल्यामुळे शेजारी शाळा स्थापन करणे शक्य नसते तसेच विरळ वस्ती असलेल्या डोंगराळ, घनदाट जंगले असलेल्या, वाळवंटी भागातील लहान मुलांना शालेय शिक्षणाकरिता वाहतूक व मदतनीस सुविधेद्वारे आधार देण्यात आला आहे. अगदी छोट्या गावांमध्ये (दुर्गम, आदिवासी, वाळवंटी भागात) राहणाऱ्या मुलांच्या गरजा भागविण्याकरिता जेथे शाळा सुरु करणे व्यवहार्य नसते अशा मुलांकरिता शाळेतून ये-जा करण्याकरिता मोफत वाहतूक सुविधा किंवा निवासी सुविधाद्वारे शाळेतील प्रवेश सुनिश्चित करता येईल.

शाळा उपलब्ध नसलेल्या विरळ लोकवस्ती असलेल्या किंवा शहरी भागातील वंचित मुलांकरिता इयत्ता 1 ली ते 8 वी पर्यंत वाहतूक सुविधा पुरविण्यात आली आहे.या पूर्वी सर्व शिक्षा अभियान अंतर्गत वाहतूक सुविधांकरिता प्रति विद्यार्थी प्रति वर्षी 3000 रुपये अनुज्ञेय होते. परंतु या योजने अंतर्गत प्रति विद्यार्थी प्रति वर्षी 6000 रुपये याप्रमाणे अनुदानात वाढ करण्यात आली आहे. सदर योजने अंतर्गत निधी वितरण करताना अंतर, प्रदेश, वाहतुकीचा प्रकार या बाबींचा विचार करून अनुदान अदा करण्यात येईल.

### मोफत पाठ्यपुस्तके व गणवेश :

पूर्वी सर्व मुलींना आणि अनुसूचित जाती जमाती, आर्थिक दुर्बल घटकातील शासकीय शाळेत शिकणाऱ्या इयत्ता 8 वी पर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना गणवेशाचे दोन संच दिले जात होते. समग्र शिक्षा अंतर्गत प्रति विद्यार्थी प्रति वर्षी 400 ते 600 अशी वाढ करण्यात आली आहे. गणवेश वाटप योजनेचा मुख्य हेतू म्हणजे मुलांना शाळेबद्दल आत्मियतेच्या भावनेने प्रेरित करणे.

पाठ्यपुस्तकाचा योग्य वापर हा शाळेतील दर्जेदार शिक्षणाचा एक प्रमुख द्योतक आहे. पाठ्यपुस्तकाचे लेआउट व डिझाईन, मजकूर, मुखपृष्ठाचा आकार, वैशिष्ट्ये आणि शाई, छपाई व बांधणी इत्यादी बाबींसह पाठ्यपुस्तकाच्या उत्पादनांमध्ये बदल केलेला आहे व त्यातून महत्त्वपूर्ण परिणाम साधला जात आहे. शासकीय शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा व शासकीय अनुदानित शाळा तसेच राज्य शासनाचा अभ्यासक्रम राबविण्यात इच्छुक असणाऱ्या मदरशा शाळांसह पाठ्यपुस्तकाकरिता प्राथमिक स्तरावर रुपये 150/- वरून रुपये 250/- पर्यंत प्रति विद्यार्थी प्रति वर्षी अनुदान वाढविण्यात आले आहे आणि उच्च प्राथमिक स्तरावर रुपये 250/- वरून 400/- रुपयांपर्यंत प्रति विद्यार्थी प्रति वर्षी वाढ करण्यात आली आहे. इयत्ता पहिली व दुसरी करिता प्रति विद्यार्थी रुपये दोनशेच्या मर्यादेत संदर्भ साहित्यासह बोलीभाषेत विकसित केलेली पाठ्यपुस्तके इंग्रजी व राज्य भाषेच्या (प्रमाणभाषेच्या) सूचनांच्या संक्रमणाची सुलभन करण्यास ही पुस्तके योग्य आहेत.

### केंद्र संसाधन समूहाचे सक्षमीकरण – (Mobility Support to CRC'c) :

केंद्र संसाधन समूह शाळा आणि शिक्षकांना प्रशिक्षण देण्याकरिता व प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात सहकार्य करणारा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. शाळेच्या चांगल्या कामगिरीसाठी शैक्षणिक विषयांवर चर्चा करण्याकरिता योग्य कृती आराखडा तयार करण्याकरिता नियमित शाळा भेटी करणे आणि नियमित मासिक सभा आयोजित करणे आवश्यक आहे.

शाळेतील भौतिक सुविधा व इतर प्रशासकीय बाबींचा ठराविक कालावधीने तपासणी व पर्यवेक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. याशिवाय शिक्षकांच्या सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासाकरिता शैक्षणिक तसेच अभ्यासक्रमीय या बाबींबाबत सहकार्य करण्याकरिता निश्चित कार्यपद्धती विकसित करणे गरजेचे आहे . त्या अनुषंगाने प्रत्येक केंद्र संसाधन समन्वयकाने आणि त्यांच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या शाळेला शैक्षणिक सहकार्य देण्याकरिता दोन महिन्यातून किमान एकदा भेटी देणे आवश्यक आहे आणि मग मानव संसाधन विकास मंत्रालयाने उपलब्ध करून दिलेल्या सार्वजनिक संकेतस्थळावर याबाबत अहवाल पाठवणे आवश्यक आहे.

### गटसाधन केंद्राद्वारे अहवाल :

शैक्षणिकदृष्ट्या शैक्षणिक संसाधन गटसाधन केंद्राचे महत्त्व अद्यापही समजू शकले नाही आणि शैक्षणिकदृष्ट्या त्यांची भूमिका व कार्य याबाबत दिशा निश्चित असायला हवी. गट संसाधन केंद्र/शहर साधन केंद्रांनी शाळांमध्ये सुरू असलेल्या शैक्षणिक समस्यांचा शोध घेऊन त्यावर कृती आराखडा तयार करून उपाययोजना करणे आवश्यक आहे.

गटसाधन व्यक्तींना पुरेसे प्रशिक्षण दिले जाईल व त्याचा प्रभावी वापर केला जाईल. एकात्मिक शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत सर्व लक्ष गटांना जसे शिक्षक, मुख्याध्यापक, गट आणि केंद्र साधनव्यक्ती इत्यादींना एकाच व्यासपीठावर आणून समान आशयाला केंद्रित करून त्यांच्या त्याबाबत निश्चित जबाबदाऱ्या व भूमिका इत्यादी बाबत उद्बोधन करण्यात येईल. प्रत्यक्ष प्रशिक्षणात शिकलेल्या बाबींचे वर्ग आंतरक्रियांमध्ये संक्रमण होते का याची खात्री करण्याकरिता नियमित निरीक्षण व आढावा घेण्याकरिता गटसाधन व्यक्तीद्वारे शाळा भेटी होतील. मोबाईल apps चा वापर करून अहवाल सादर केला जाईल. या आधारे मध्यवर्ती सर्व्हरवर ही माहिती संकलित केली जाईल. त्या ठिकाणी विसंगती अहवाल तयार करून आवश्यक कार्यवाहीकरिता पाठपुरावा करण्यात येईल.

## शाळा व्यवस्थापन समिती (SMC) प्रशिक्षण :

केंद्र संसाधन समन्वयकांनी शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांचे प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. राज्य शासनाद्वारे सर्व शाळांत निश्चित करून दिलेल्या दिवशी सर्व व्यवस्थापन समितीच्या वर्षातून चार (तीन महिन्यातून एक) अशी सभा आयोजित करणे आवश्यक आहे. अशा सर्व शाळांनी घेतलेल्या कृतीचा मोबाइल App वर त्रैमासिक अहवाल सादर करण्याकरिता शासनाद्वारे मदत पुरविण्यात येईल. विशिष्ट योजनेच्या अधीन राहून प्रत्येक शासकीय शाळेला प्रतिवर्ष प्राथमिक व उच्च प्राथमिक स्तरावर रुपये पाच हजार रुपयांपर्यंतची मदत पुरविण्यात येईल.

## समग्र शिक्षेच्या बोधचिन्हाचे प्रदर्शन :

समग्र शिक्षेचे बोधचिन्ह हे या योजनेचा आत्मा व दृष्टीचे प्रतीक आहे. बोधचिन्हे आत्मविश्वास वाढविण्यासाठी आणि शाळा, विद्यार्थी व समुदायांच्या व्यापक संबंध निर्माण करण्यास मदत करते. यापूर्वी सर्व शिक्षा अभियानांतर्गत बोधचिन्ह शाळेच्या भिंतीवर गेले होते. हे बोधचिन्ह समुदायाकडून उत्स्फूर्तपणे ओळखले गेले व या चिन्हांमध्ये शाळेची ओळख होण्यास मदत झाली.

अशा प्रकारे सर्व शाळांसाठी प्रामुख्याने आपल्या शालेय परिसरात प्रतीक/बोधचिन्ह प्रदर्शित करणे महत्त्वाचे झाले आहे. सर्व शाळांनी समग्र शिक्षा योजने अंतर्गत असलेल्या सुविधांसह उदाहरणार्थ मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश इत्यादी समग्र शिक्षा योजनेचे बोधचिन्ह भिंतीवर रंगवून किंवा दर्शनी फलक तयार करून शाळेच्या दर्शनीय जागी लावणे आवश्यक आहे. बोधचिन्हाचे स्वरूप मनुष्यबळ विकास मंत्रालयाद्वारे दिले जाईल.

## बक्षिसे, विश्वसनीय माहिती आणि दायित्व

### यु-डायस+

देशातील सर्व शाळेची माहिती यु-डायस एकत्रित/ संकलित करतो. सन 2018-19 पासून यु-डायस अद्ययावत करून, नवीन वैशिष्ट्यांसह प्रदर्शित/ओळख करून देण्याचे निश्चित करण्यात आलेली आहे. यु-डायस+ (अप्लिकेशन) हे ऑनलाईन असेल. ते हळूहळू वेळोवेळी सद्य:स्थितीची माहिती संकलित करू लागेल. युडायस + ॲप्लिकेशनची माहिती संकलनाबरोबर पुढील प्रमाणे इतर वैशिष्ट्य आहे.

- माहिती विश्लेषण व माहितीचे दृढीकरण यांसह डॅशबोर्ड विकसित केला जाईल. यात अनेक वर्षातील प्रवाहांचा अभ्यास करण्यासाठी आणि वाढीवर लक्ष ठेवण्यासाठी टाईम सिरीज डेटाचा माहितीचा समावेश असेल. मुख्य कामगिरी निर्देशांकामधील प्रगतीचा मागोवा घेतला जाईल.
- जीआयएस mapping या प्रणालीला जोडले जाईल आणि शाळा अहवाल कार्ड तयार केले जातील. माहितीची गुणवत्ता निश्चित करण्याकरिता मोबाईल ॲप्ससह त्रयस्थ संस्थेच्या पडताळणीकरिता स्वतंत्र घटक संच विकसित केले जाईल.






**Performance Grading Index (PGI)**

शालेय शिक्षणामधील ७० दर्शकांनुसार राज्य व केंद्रशासित प्रदेशांचे त्यांच्या शैक्षणिक कामगिरीचे मूल्यांकन करण्याच्या हेतूने PGI दर्शक तयार करण्यात आले आहे.

1. निर्देशांक/दर्शके राज्य व केंद्रशासित प्रदेशाची श्रेणी निश्चित करतील; त्याद्वारे एकापेक्षा जास्त राज्य केंद्रशासित प्रदेश समान श्रेणी प्राप्त करण्याचा प्रयत्न करतील आणि सर्व ३६ राज्य व केंद्रशासित प्रदेश उच्च स्तरावर पोहोचतील. PGI हे राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना शिक्षकांच्या ऑनलाईन भरती, शिक्षकांचे ऑनलाइन बदल्या, विद्यार्थी व शिक्षकांची इलेक्ट्रॉनिक उपस्थितीत इत्यादी विशिष्ट पद्धती अवलंबिण्यास प्रोत्साहित करण्याचे एक साधन म्हणून संकल्पित केलेले आहे.
2. PGI मध्ये एकूण 70 दर्शक आहे. ते संपादणूक आणि शासन प्रक्रिया या दोन विभागांमध्ये विभागलेले आहे. प्रथम श्रेणी विभाग हा चार डोमेन मध्ये विभागला गेला आहे. यात अध्ययन संपादणूक, प्रवेश परिणाम, पायाभूत सुविधा, इतर सुविधा आणि समता विषय बाबींचा समावेश आहे. दुसरा विभाग हा शासन प्रक्रियेचा आहे. यात उपस्थिती, शिक्षकांची पर्याप्तता, प्रशासकीय पात्रता/पर्याप्तता, प्रशिक्षणे, दायित्व/जबाबदारी, पारदर्शकता इत्यादी समाविष्ट आहेत.
3. PGI अंतर्गत 1000 गुण आहे. प्रत्येक दर्शकाला दहा 20 गुण किंवा 10 गुण देण्यात आलेले आहेत.

## शगुन पोर्टल :

18 जानेवारी 2017 रोजी मानव संसाधन विकास मंत्री यांनी शगुन पोर्टल चा शुभारंभ केला. (www.seshagun.nic.in) यात दोन विभाग आहेत.

1) नवोपक्रमांचा संग्रह/भांडार
2) ऑनलाईन पर्यवेक्षण/देखरेख

## डिजिटल भांडार :

सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांनी विविध परिस्थितीत राबविल्या जाणाऱ्या नावीन्यपूर्ण आणि यशस्वी ठरलेल्या प्रतिकृतीचे प्रदर्शन करून शालेय शिक्षणाचा दृष्टिकोन/चित्र बदलण्याकरिता डिजिटल संग्रहाची रचना केली गेलेली आहे. अशा प्रकारचे यशस्वी उपक्रम नावीन्यपूर्ण प्रतिकृती बनविण्यास आणि व्यापक प्रमाणात घेण्यास सक्षम करतात.

चांगल्या पद्धतीचे उपक्रमाचे हे भांडार सकारात्मक कथा आणि घडामोडीवर लक्ष केंद्रित करते. त्यामुळे शालेय शिक्षणातील कामगिरी सुधारण्याकडे वाटचाल सुरू आहे. या नावीन्यपूर्ण गोष्टींचे/बाबींचे दस्तऐवजीकरण, यशोगाथा, व्हिडिओ, प्रशस्तीपत्रके, प्रतिमा इत्यादी स्वरूपात केले जाते.

हे डिजिटल व्यासपीठ जनता, प्रसारमाध्यमे, भागधारक, प्रभावी घटक, जागतिक शैक्षणिक संस्था, प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात नावीन्यपूर्ण कल्पना आणि यशोगाथा यांची नोंद करण्यास सांगते. राज्य सरकारी सार्वजनिक शाळा, शिक्षक विद्यार्थ्यांना फायदा

झालेल्या नव्या कल्पनांचे या भांडारात दस्तऐवजीकरण करून प्रसारित केले जाते. शगुन संग्रहात उत्तम पद्धतीवर 296 व्हिडिओ, 269 यशोगाथा, 151 प्रशस्तिपत्रके आणि चार हजार 586 छायाचित्र आहेत.

सन 2018-20 मध्ये विभागाने (शालेय शिक्षण व साक्षरता) विभागातील सर्व योजनांसह आणि एक आणि NCERT, NIOS KVS, NVS, CBSE आणि राष्ट्रीय बालभवन यांसारख्या विविध स्वायत्त संस्थांच्या कार्यक्रमांच्या ॲक्टिव्हिटीजचा समावेश करून या संग्रहाचा विस्तार करण्याचे ठरवले आहे.

## पर्यवेक्षक :

शगुनचे ऑनलाईन पर्यवेक्षण घटकसंच मुख्य शैक्षणिक निर्देशांकानुसार राज्यस्तरीय कामगिरीचे आणि प्रगतीचे मापन करते.




त्यामुळे DSEL आणि राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील शिक्षण विभाग वास्तविक कालानुसार मूल्यमापन करण्यास सक्षम होतील. निधीच्या वापराचे Ttacking/अनुधावन. मुख्य शैक्षणिक निर्देशांकानुसार कामगिरीचे मोजमाप, ऑनलाईन नियोजन, ध्येयनिश्चिती, भौतिक लक्ष्य आणि परिणामांच्या संपादणुकीचे पर्यवेक्षण इत्यादी मुख्य कार्य आहे. हे पोर्टल माहितीचे विश्लेषण उपलब्ध करून देते आणि आलेख तयार करते. मुख्य शैक्षणिक प्रवाहातून शाळाबाह्य झालेल्या बालकांचा निश्चित आकडा, खाजगी शाळांच्या तुलनेत शासकीय शाळांमधील पटनोंदणीत झालेली घट व वाढ, अध्ययन संपादणूक वृद्धिंगत करण्यासाठी आणि शिक्षकांच्या वेतनावर केलेला खर्च इत्यादी राज्य व केंद्रशासित प्रदेशातील मुख्य निश्चित प्रमांणकांच्या प्रगतीचे चित्र या आलेखाद्वारे प्रदर्शित केल्या जाते.

## शगुनोत्सव :

शगुनोत्सवसारख्या मोठ्या कार्यक्रमांतर्गत ऑगस्ट ते सप्टेंबर, 2019 या कालावधीत देशभरातील सर्व शासकीय शाळांना भेटी दिल्या जातील आणि शाळेची तपासणी केली जाईल. ही तपासणी म्हणजे जवळपास 7 लक्ष स्वयंचलित प्राथमिक शाळांसह सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशातील सर्व 11.85 लक्ष शासकीय आणि अशासकीय अनुदानित शाळांची सप्टेंबर, 2019 मध्ये करावयाची जनगणना आधारित तपासणी/परीक्षण होय. शालेय स्तरावरील गुणवत्ता व पायाभूत सुविधांचे मूल्यांकन करण्याकरिता UDISE, SHAGUN, Project Monitaring System (PMS), आणि PGI या साधनाद्वारे सध्या शालेय विविध मापदंडावर आधारित माहिती गोळा केली जाते.

तथापि क्षेत्रीय भेटीद्वारे या कामाला बळकटी दिल्या जात नाही. आकांक्षित जिल्ह्याच्या मध्यवर्ती प्रभारी अधिकाऱ्यांकडून प्राप्त अभिप्रायावरून असे निदर्शनास येते की बहुतांश शाळांना भेटी दिल्या जात नाही किंवा भेटीची वारंवारता खूपच कमी असते. म्हणूनच

पुरेशी पायाभूत सुविधा शिक्षक, विद्यार्थी, शाळा व्यवस्थापन आणि समाज सहभागाची परिपूर्णता निश्चित करण्यासाठी प्रत्येक शाळेचा शाळा आधारित जनगणनेचा अभ्यास करण्याची गरज निर्माण झाली आहे.

शाळेच्या जनगणनेचे मानके हे यु-डायस प्लस, PGI आणि शगुन यांच्याद्वारे परीक्षण केलेल्या निर्देशांकावर आधारित असतील. अध्ययन निष्पत्तीचे मूल्यांकन हे मूल्यमापनचा भाग असणार नाही, कारण पुढील फेरीत NAS/शाळा आधारित मूल्यांकन मधून ते मूल्यांकन घेण्यात येईल. शाळांना विशिष्ट गरजांच्या सुविधांकरिता आणि योग्य धोरणात्मक हस्तक्षेप करण्यासाठी अभिप्राय सहाय्यभूत ठरतील. 25 एप्रिल, 2019 रोजी या कार्यक्रमासाठी मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आलेल्या आहेत.

## चांगल्या कामगिरीची ओळख :

### शिक्षकांसाठी राष्ट्रीय पुरस्कार :

सन 1958 मध्ये या पुरस्काराची स्थापना झाली. 1960 चा शतकाच्या मध्यावधीपासून भारतात भूतपूर्व राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनानिमित्त 5 सप्टेंबर ही तारीख या पुरस्काराच्या कार्यक्रमासाठी निश्चित करण्यात आली आहे. वर्षानुवर्षे पुरस्कारांची संख्या वाढत ती 378 पर्यंत पोहोचली आहे. परंतु असे वाटते की पुरस्काराचा दर्जा कमी आलेला आहे. सन 2018 मध्ये प्रमुख राष्ट्रीय पुरस्कारांमधील बदलांच्या धर्तीवर या योजनेत मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. नवीन योजना पारदर्शक निष्पक्ष असून पुरस्कारातून उत्कृष्टता व कार्यक्षमता याचे प्रत्यंतर येते.

नवीन योजनेची वैशिष्ट्ये :

1. www.mhrd.gov.in`m वेबसाईटवर शिक्षकांकडून स्वतःचेही नामांकन करण्यासाठी त्यांना आमंत्रित केले गेले. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह स्टाफ कॉलेज ऑफ इंडिया (ASCI) ने हे वेब पोर्टल विकसित केली आहे. कुठल्याही तक्रारी आणि अडचणी शिवाय हे सॉफ्टवेअर सहकार्य करीत आहे.
2. संपूर्ण देशभरातून जवळजवळ सहा हजार शिक्षकांकडून प्राप्त झालेल्या अर्जांवर हा उपक्रम/कार्यक्रम यशस्वी झाल्याचे स्पष्टपणे दिसून येते.
3. अर्ज करण्याकरिता सर्व नियमित शिक्षक पात्र आहे. किमान सेवेच्या वर्षांची गरज नाही. त्यामुळे गुणवंत तरुण शिक्षकांनाही अर्ज करता येतो.
4. पुरस्कारांच्या संख्येचे सुसूत्रीकरण करून ती 45 पर्यंत केली आहे. त्यामुळे शालेय शिक्षणातील पुरस्कारांची प्रतिष्ठा न पुनर्संचयित झाली.
5. अंतिम निवडीमध्ये कोणत्याही राज्य, केंद्रशासित प्रदेश किंवा संस्थेचा वाटा नव्हता. त्यामुळे पुरस्काराकरिता स्पर्धा करण्यास प्रोत्साहन मिळाले.
6. राष्ट्रीय स्तरावरील स्वतंत्र निर्णय मंडळाने अंतिम निवड केली आणि सर्व राज्य, केंद्रशासित प्रदेश आणि संस्था-संघटनांनी तयार केलेल्या 152 उमेदवारांच्या यादीचा आढावा घेतला. प्रत्येक नामनिर्देशित व्यक्तीने पंचांसमोर/निर्णय मंडळासमोर सादरीकरण केले. त्या आधारित अंतिम मूल्यांकन झाले आणि शिक्षक पुरस्काराकरिता 45 नावांची शिफारस करण्यात आली.

४ सप्टेंबर, २०१८ रोजी आदरणीय पंतप्रधानानी त्यांच्या निवासस्थानी पुरस्कार प्राप्त शिक्षकांशी संवाद साधून त्यांचा सत्कार केला. पुरस्कार विजेत्यांपैकी अरविंद जाजवारे, झारखंड आणि महाराष्ट्रातील विक्रम अडसूळ यांनी पटनोंदणी वाढविण्याकरिता आणि गळतीचा दर कमी करण्यासाठी 'आनंददायी अध्ययन पद्धतीचा' उपयोग केल्याचे सांगितले. गुजरात मधील राकेश पाटील, राजस्थान मधील इम्रान खान यासारख्या शिक्षकांनी आपल्या शाळेला शिक्षणाचे मंदिर/घर बनविण्यासाठी आयसीटी आणि विद्यार्थीकेंद्रित, कृतिआधारित अध्ययन पद्धती विकसित केल्या. कर्नाटकमधील शैला आर. एन. यासारख्या शिक्षकांनी विद्यार्थी हितासाठी शालेय भौतिक सुविधांमध्ये सुधारणा करण्याकरिता समाज सहभागाला गतीमान केले. तर सिक्किममधील कर्मा सोनू भुटिया शिक्षकाने पटनोंदणी वाढविण्याकरिता अत्यंत संघर्ष केला




भारताचे आदरणीय उपराष्ट्रपतींनी 5 सप्टेंबर, 2018 रोजी, 'विज्ञान भवन' येथे पुरस्कार प्रदान केले. पुरस्कार समारंभात प्रत्येक पुरस्कार प्राप्त व्यक्तींच्या कामगिरीवर आधारित चित्रपट देखील दाखविण्यात आला.



## स्वच्छ विद्यालय पुरस्कार अंतर्गत स्वच्छ शाळांना पुरस्कृत करणे :

शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाने स्वच्छ विद्यालय कार्यक्रमाचे पुढचे पाऊल म्हणून जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर सन 2016-17 मध्ये स्वच्छ विद्यालय पुरस्काराची (SVP) स्थापना केली. हे पुरस्कार शाळेतील स्वच्छतेबाबत झालेल्या शाश्वत आणि टिकाऊ वर्तनबदल सुनिश्चित करण्यासाठी दिले जातात. स्वच्छ विद्यालय पुरस्कार म्हणजे शाळेमध्ये उत्कृष्ट पाणी, सुविधा, स्वच्छता, आरोग्य विषयक स्वच्छता सवयी इत्यादी बाबीं ओळखणे, प्रोत्साहित करणे आणि स्वच्छता उत्सव साजरा करणे. शाळांनी स्वच्छतेने या पुरस्काराकरिता वेबसाईट मोबाईल App च्या द्वारे ऑनलाईन अर्ज केले आहेत. स्वच्छ विद्यालय पुरस्कार 2017-18हे शासकीय आणि शासकीय अनुदानित शाळा व्यतिरिक्त खासगी शाळांसाठी खुले आहे.

**स्वच्छ विद्यालय पुरस्कार 2017-18**

स्वच्छ विद्यालय पुरस्कार 2017-18 ला शाळांकडून भरघोस प्रतिसाद मिळाला. सन 2017-18 मध्ये 6,15,152 शाळांनी या पुरस्काराकरिता ऑनलाईन नोंदणी केली. जी मागील वर्षी सहभागी झालेल्या शाळांच्या, संस्थेच्या तुलनेत दुप्पट आहे. राष्ट्रीय स्तरावरील पुरस्काराकरिता राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांनी 727 शाळांची यादी मान्यतेसाठी तयार केली. वैधता पडताळणी आणि सखोल तपासणी नंतर उत्कृष्ट ठरलेल्या 52 शाळांना SVP 2017-18 चा राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. उत्कृष्ट चार राज्य अनुक्रमे पुडुचेरी, तामिळनाडू, गुजरात आणि आंध्र प्रदेश आणि सर्वोत्कृष्ट नऊ जिल्हे अनुक्रमे पांडेचेरी, श्रीकाकुलम, चंदीगढ, हिस्सार, कराईकल, लातूर, नेल्लोर, दक्षिण गोवा आणि वडोदरा यांना 18/09/2018 रोजी आयोजित कार्यक्रमादरम्यान अधिकृत मान्यता प्रमाणपत्र देण्यात आले.

## पुरस्काराची प्रक्रिया आणि पद्धती :

पुरस्काराकरिता शाळांची निवड ही त्यांनी पाच उपविभागातील प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे केली जाते. हे पाच उपविभाग म्हणजे 1) पाणी 2) शौचालय 3) साबणाने हात धुणे 4) निरनिराळे कार्य आणि देखभाल 5) वर्तणूक बदल आणि क्षमता वाढविणे.

राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवडलेल्या सर्वोत्कृष्ट शाळांना पन्नास हजार रुपये रोख बक्षीस, शाळेत स्वच्छता व आरोग्यदायी वातावरण टिकवून ठेवण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्यासाठी अतिरिक्त अनुदान म्हणून प्रमाणपत्रासह दिले जाते. स्वच्छ विद्यालय पुरस्कारात सहभागी झालेल्या सर्वोत्कृष्ट राज्य आणि सर्व जिल्हे यांनाही पुरस्कृत करण्यात आले.

## राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील यशोगाथा :

**'नाली काली' : कर्नाटक**

हा उपक्रम बहुस्तर वर्गातील मुले आनंददायी आणि उत्साहपूर्ण वातावरणात लिहायला, वाचायला शिकण्याकरिता आणि त्यांची सर्जनशीलता विकसित करण्याकरिता तयार केला आहे. सन 2009-2010 मध्ये कर्नाटक राज्यातील सर्व शासकीय कन्नड माध्यमाच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली व दुसरी करीता नाली कालीची सुरुवात करण्यात आली. या उपक्रमात विद्यार्थी संपूर्ण अध्ययन प्रक्रियेत सक्रीय सहभाग घेतात. शिक्षकाचे दडपण कमी होते, वर्ग आंतरक्रिया जास्तीत जास्त असतात, परीक्षेबाबत चिंता व तणाव नसतो, लहान मुलांमधील कुतूहल, गतिमानता, शोध, अन्वेषण यांसारख्या असलेल्या नैसर्गिक प्रवृत्तींना एकसूत्रतेत बांधले जाते. वर्ग आंतरक्रियाची 'नाली काली' पद्धती केवळ शिक्षकांना अधिक स्वायत्ता देत नाही तर मुलांना सुद्धा मैत्रीपूर्ण आणि आनंदाने शिकण्यासाठी योग्य वातावरण देखील तयार करते. वयानुसार कार्यक्षमतेनुसार परस्परसंवादी पद्धतीने आयोजित केलेल्या गटामध्ये शिक्षण पद्धती पद्धतशीरपणे घडते. जेव्हा मुले एका गटाच्या क्षमतेवर प्रभुत्व संपादन करतात त्यानंतर ते दुसऱ्या गटाकडे पुढील क्षमता शिकण्यासाठी जातात. अध्यापन हे शिक्षकांनी स्वतः बनविलेल्या, तयार केलेल्या गाणी, खेळ, सर्वेक्षण ,कथा सांगणे, शैक्षणिक खेळण्याचा वापर आणि सुधारित आधुनिक अध्ययन अध्यापन साहित्याद्वारे होते. जेव्हा विद्यार्थ्यांना गटबद्ध केले जाते आणि अनौपचारिक पद्धतीने अध्ययन होते तेव्हा ते अध्ययन दीर्घकाळ स्मरणात राहते. या संकल्पनेत प्रामुख्याने अध्ययनाचे ओझे कमी करणे आणि किमान अध्ययन क्षमतावर प्रभुत्व संपादन करणे यावर भर दिला जातो.

### 'गणिथा कालिका आंदोलन' (GK) कर्नाटक :

कर्नाटक राज्याने सर्व शासकीय, प्राथमिक शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये संख्यात्मक कौशल्य वृद्धिंगत होण्यासाठी व गणित वर्ग अध्यापनात सुलभता आणण्याकरिता गणित अध्ययन चळवळ कार्यक्रम 'गणिथा कालिका आंदोलन' सुरू केले. असे मानले जाते की, गणित हे एक पायाभूत शिस्त/वळण आहे आणि शाळेतील भविष्यकालीन अध्ययन हे या गणितावरच अवलंबून असते हा एक आदर्श सहाय्यभूत कार्यक्रम असून या कार्यक्रमाचा मुख्य हेतू गणितीय संकल्पनांची घोकंपट्टी करण्यापेक्षा कृतियुक्त सर्जनशील पद्धतीद्वारे कृतीतून अनुभवातून समजून घेणे आणि सहाध्यायी अध्ययन इत्यादींचा उपयोग करून मुलांमध्ये गणितीय अध्यनातील उणिवा दूर करणे हा आहे. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना स्पष्ट विचार करण्यास आणि दैनंदिन जीवनातील गणितीय समस्या ओळखण्यात प्रोत्साहित करतो. शासकीय प्राथमिक शाळांमध्ये गणितीय अध्ययन-अध्यापन साहित्याची तरतूद उपलब्ध करून देऊन आणि शिक्षकांना प्रशिक्षण व सहकार्य देऊन हा उपक्रम राबविला जातो. कर्नाटक राज्याच्या अभ्यासक्रमात नमूद केलेल्या कौशल्यांचा अभ्यास करण्यास सुलभता येण्यासाठी या अध्ययन-अध्यापन साहित्याची रचना केली आहे. अध्ययन निष्पत्तीचे मोजमाप करण्यासाठी टॅबलेटवर अँड्रॉइड आधारित ॲप्लिकेशनचा उपयोग करून विद्यार्थ्यांचे मूल्यांकन केले जात आहे. हा कार्यक्रम गणित अध्ययन निष्पत्तीचा दर्जा वाढविण्यासाठी केला जात असलेल्या प्रयत्नांना पूरक आहेत.

### कृती आधारित अध्ययन (ABL) तामिळनाडू :

कृती आधारित अध्ययन हे मुख्यतः वर्ग सुधारणेवर लक्ष केंद्रित करून तयार करण्यात आलेला आहे. हे विद्यार्थ्यांना वैयक्तिक कृती करणे आणि मनोरंजन व आंतरक्रिया पद्धतीने स्वयं-अध्ययनास सक्षम करते. कृती आधारित अध्ययन हे 'ऋषी व्हॅली रुरल एज्युकेशन सेंटर' या स्वयंसेवी संस्थेच्या मॉडेलवर आधारित असून ते त्यांच्या आनंददायी अध्ययन कार्यक्रमाच्या प्रयोगासाठी आणि शिक्षकांच्या सखोल प्रशिक्षणासाठी प्रसिद्ध आहे. वर्गातील कृती आधारित अध्ययन (ABL) करणारा शिक्षक हा सुलभकामध्ये रूपांतरित झाला आहे. तो वर्गात व्याख्यान देत नाही किंवा एकाच पद्धतीने संपूर्ण वर्गाला अध्यापन करीत नाही. ABL वर्गांमध्ये मुले त्यांच्या वयानुसार इयत्तांचा विचार न करता त्यांच्या अध्ययन पातळीनुसार एकत्र बसतात.

कृती आधारित अध्ययन वर्गामध्ये विविध प्रकारचे कार्ड आणि साहित्य आहेत. त्याद्वारे विविध पातळीवरील भिन्न क्षमता असलेले मुले रचनात्मक अध्ययनात सक्षम बनतात. दिवसाच्या ॲक्टिव्हिटी कार्ड निवडण्यापासून ते स्वतःची हजेरी नोंद करणे इत्यादी कृतीद्वारे मुले लहान वयात स्वतःचा स्वतंत्र निर्णय घेण्यास शिकतात.

### सपनो की उडान कार्यक्रम :

### मोबाईल स्कूलच्या माध्यमातून शाळाबाह्य मुलांना शिक्षित करण्याचा उपक्रम (उत्तराखंड)

शिक्षणाच्या अधिकाराचे पुनरावलोकनांतर्गत दर्जेदार शिक्षणाची पोच वाढविण्याकरिता मोबाईल शाळा बहुउद्देशीय वाहनांचा उपयोग करून समाजामध्ये जागरुकता व प्रेरणादायी मोहिमेद्वारे मोबाईल स्कूलिंग सुविधा उपलब्ध करून देते. समाजात जागृती व समुपदेशनाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी पात्र साधन व्यक्ती, मल्टीमीडिया सिस्टीम आणि विविध अध्ययन साहित्यासह वाहने पुरविले जात आहे. या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे शाळेच्या मुख्य प्रवाहापासून बाहेर पडलेल्या मुलांची ओळख पटविणे आणि अशा मुलांची ओळख पटविण्याकरिता विविध कार्यक्रम आखणे आणि अशा मुलांना शेजारील शाळेत शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरिता वयानुरूप विशेष प्रशिक्षणाची व्यवस्था करणे.

### बहुभाषिक शिक्षण (MLE) ओडिसा

हा एक संरचित कार्यक्रम असून यादवारे योग्य बौद्धिक व आकलन कौशल्ये विद्यार्थ्यांमध्ये विकसित करण्यासाठी तयार करण्यात आला आहे. एकाचवेळी मातृभाषा, द्वितीय भाषा (ओडिसा) व तृतीय भाषा (इंग्रजी) यातील कौशल्य समान पातळीवर विकसित करण्यास मदत होते. ज्यांची मातृभाषा ओडिसा नाही अशा आदिवासी मुलांना हे आव्हानात्मक असले तरी मुलांना ओडिसा भाषेमध्ये शिकविले जाते. त्यामुळे आदिवासी मुलांना वर्ग अध्यापन करणे अध्ययन कृती व पूर्ण आकलन यावर परिणाम होत होता.

या कार्यक्रमांतर्गत शालेय शिक्षण मातृभाषा व इतर भाषेमध्ये मिळू लागले. लहान वयोगटातील मुलांना ज्ञान मिळविणे, ज्ञानाची

बांधणी व अनुभवासाठी मातृभाषा ही पाया असते. त्यामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढतो व स्व–जाणीव होते. हा कार्यक्रम 17 आदिवासी जिल्ह्यातील 21 आदिवासी भाषांमध्ये सुरू आहे.

### Pragana गुजरातमधील कृती आधारित अध्ययन मॉडेल

श्री. गजुभाई बडेका यांचेद्वारे दक्षिणमूर्ती स्कूल, भावनगर येथे राबविण्यात आलेल्या कृतिआधारित आंनददायी अध्ययन या संकल्पनेवर आधारित कार्यक्रमामुळे गुजरात राज्यात कृतिआधारित अध्ययन मॉडेलची सुरुवात झाली. यामध्ये प्राथमिक स्तरावरील वर्गांसाठीची पाठ्यपुस्तकेही याच अध्यापनशास्त्रावर विकसित करण्यात आली.

2009 मधील गुणोत्सव 1 मध्ये इ. पाचवीनंतरही खूप मुले वाचन, लेखन व गणन या मूलभूत कौशल्यांमध्ये मागे असल्याचे दिसून आले. या समस्येचे विश्लेषण करत असताना असे दिसून आले की, अध्ययनाची हमी देणाऱ्या अध्यापनशास्त्राची गरज आहे. यासाठी अध्यापनशास्त्रावर आधारित विविध कार्यशाळांमधून अनेक मॉडेल्सची चर्चा करण्यात आली व ABL (Activity Based Learning) कृती आधारित अध्ययनास दृढ करण्याचे निश्चित करण्यात आले.

यानुसार ऋषी व्हॅली मॉडेल (Rushi Valley Model, MGMC) यासाठी वापरण्यात आले. राज्याने यामध्ये आवश्यक सुधारणा करून ABL-Pragana (Pravrutti Dwara Gnan) ही पद्धती तयार केली. राज्याद्वारे एक गाभा समिती स्थापन करण्यात आली आणि इतर राज्यातील Rushi Valley Model वापरणाऱ्या शाळांमध्ये अंमलबजावणी करण्यात आली. यानंतर गाभा समितीने युनिसेफच्या सहकार्याने ABL-Pragana पद्धतीसाठी नवीन साहित्य विकसित केले. त्यामध्ये प्रस्तावना – सराव – मूल्यमापन (Introduction Practice - Evaluation) हे अध्ययन चक्र प्रत्येक संकल्पनेसाठी वापरले जाते याची खात्री करण्यात आली आहे.

### उपक्रमाचा तपशील

- आशय हा लहान–लहान कृतीमध्ये विभागला गेला आहे आणि प्रत्येक कृतीकरिता विशिष्ट कार्ड आहे.
- आशय क्रमबद्ध शिडीमध्ये आयोजित केलेला आहे. त्यातून एकामागून एक कृती पूर्ण करून विद्यार्थी स्वतः स्वतःची प्रगती करतात.
- मुलांना चार वेगवेगळ्या गटांमध्ये विभागलेले असते. मुले त्याच्या/तिच्या प्रगतीनुसार वैयक्तिकरित्या गट बदलत असतात.
- तीन प्रकारच्या आंतरक्रिया शिक्षक–विद्यार्थी, विद्यार्थी–विद्यार्थी, विद्यार्थी–साहित्य निश्चित केले जातात.
- सर्व संकल्पना शिकण्यासाठी अध्ययन चक्र पूर्ण करण्याच्या मूलभूत पायऱ्या (संकल्पनेची ओळख, सराव, मूल्यमापन) प्रत्येक मुलासाठी अबाधित ठेवल्या आहे.
- प्रत्येक मुलाचे शिडीद्वारे मूल्यांकन केले जाते. कारण सातत्यपूर्ण मूल्यमापन हा या कार्यक्रमाचा अविभाज्य भाग आहे.

### परिणाम प्रभाव :

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादणूक सुधारणा झालेली आहे. तीन मुख्य अभ्यासाअंती असे दिसून आले की, प्रज्ञा उपक्रम सुरू असलेल्या शाळांची कामगिरीही प्रज्ञा उपक्रम सुरू नसलेल्या शाळांपेक्षा चांगली आहे. पहिले संशोधन प्रथम द्वारे करण्यात आले. युनिसेफ आणि शैक्षणिक पुढाकार यांद्वारे दुसरे संशोधन करण्यात आले आणि गुजरात शासनाच्या मूल्यमापन विभागातर्फे तिसरे संशोधन आयोजित करण्यात आले. दुसरा महत्त्वाचा फायदा म्हणजे प्रज्ञा वर्गखोली ही समावेशित वर्ग खोली आहे कारण गतिमान पद्धतीने प्रत्येक मुलाला सर्व मुलांसोबत काम करण्याची संधी उपलब्ध केली जाते.

अध्ययन संपादणूक या प्रमुख फायद्याशिवाय या पद्धतीची खालील प्रमाणे इतरही फायदे दिसून आलेले आहेत.

- खाजगी शाळा या अध्यापन पद्धती मी प्रेरित होतात आणि त्यांच्या शाळेत अध्यापन पद्धतीची अंमलबजावणी करतात.
- आंतरक्रियात्मक आणि नावीन्यपूर्ण अध्ययन विद्यार्थ्यांना भाषण, श्रवण आणि सर्जनशील विचारप्रक्रियेकरिता भरपूर सराव देते आणि भाषेच्या वापरात ओघ आणि आत्मविश्वास विकसित करते.
- ही अध्यापन पद्धती बालकांना ओझ्याविना शिक्षण आणि अनुभवातून शिक्षणाची संधी उपलब्ध करून देते.
- मुलांना/बालकांना विविध प्रकल्प कार्यांमध्ये आणि क्षेत्रीय कार्यांमध्ये प्रदर्शन करण्याची संधी मिळते.
- विद्यार्थ्यांनी/मुलांनी केलेल्या निर्मितीचे प्रदर्शन करण्याची संधी मिळते.

2010 मध्ये 256 शाळांमध्ये हा कार्यक्रम सुरू झालेला होता. सन 2017-18 पर्यंत या कार्यक्रमाचा विस्तार होऊन जवळपास बावीस हजार शाळांमध्ये हा कार्यक्रम सुरू आहे. या कार्यक्रमात थोड्या सुधारणा करून प्रज्ञा कार्यक्रम सन 2018-19 मध्ये राज्यातील सर्व शाळांमध्ये सुरू करण्यात आला.

## मध्यान्ह भोजन :

पटनोंदणी, उपस्थिती वाढ करणे व मुले शाळेत टिकविणे आणि सोबतच मुलांची पोषणस्थिती/दर्जा सुधारण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत प्राथमिक शिक्षणाचा पोषण सहाय्य राष्ट्रीय कार्यक्रम (NP-NSPE) 15 ऑगस्ट, 1995 रोजी सुरू करण्यात आला. उच्च प्राथमिक इयत्ता मधील विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळण्यासाठी या योजनेचा 2008-09 मध्ये विस्तार करण्यात आला. या योजनेचे नामकरण 'शालेय मध्यान्ह भोजन राष्ट्रीय कार्यक्रम' असे करण्यात आले. ही योजना मध्यान्ह भोजन योजना म्हणून प्रसिद्ध आहे. माध्यान्ह भोजन योजनेचा लाभ शासकीय आणि शासन अनुदानित शाळेतील इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना मिळतो. समग्र शिक्षा अंतर्गत विशेष प्रशिक्षण केंद्रे (STCS) आणि मदरसे आणि मक्तब यांनाही सहाय्य केले जाते.

मध्यान्ह भोजन योजनेचे एक उद्‌दिष्ट म्हणजे विद्यार्थ्यांचा पोषण दर्जा सुधारणे या उद्‌दिष्टांच्या पूर्ततेसाठी करिता आणि भारतातील बहुसंख्य मुलांमध्ये असलेली मुख्य समस्या म्हणजे भूक या समस्यांचे निराकरण करण्यासाठी MDM मध्यान्ह भोजन ने मार्गदर्शक तत्वांची आखणी केली. त्यानुसार प्राथमिक आणि उच्च प्राथमिक स्तरावर बालकांना/विद्यार्थ्यांना अनुक्रमे 450 ते 700 कॅलरीज मिळाल्या पाहिजे.

शैक्षणिक वर्ष 2018-19 मध्ये 11.3 लक्ष पात्र शाळातून इयत्ता पहिली ते आठवीचे शिक्षण घेणाऱ्या 9.17 विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळालेला आहे.

## शालेय पोषण बागची स्थापना :

शालेय पोषण बाग ही एक जागा आहे की जिथे औषधी वनस्पती, फळे, भाजीपाला इत्यादीचे शालेय परिसरात लागवड करून त्याचा उपयोग मध्यान्ह भोजन तयार करताना केला जातो. शालेय पोषण बाग विकसित करण्याचे उद्‌दिष्ट म्हणजे कुपोषण व सूक्ष्म पोषक तत्वांची कमतरता दूर करण्यासाठी मदत करणे आणि विद्यार्थ्यांना निसर्ग व भाग कामाच्या माध्यमातून स्वतः काम करण्याचा प्रथम मुक्त अनुभव देणे. शालेय पोषण बाग स्थापनेसाठी/निर्मितीकरिता मोठ्या जमिनीची आवश्यकता नाही. मोठ्या कुंड्यांमध्ये भाज्यांची लागवड करून त्याचा उपयोग करता येईल. तेथे जमीन उपलब्ध नाही तेथे रोपांच्या लागवडीकरिता छोट्या बरण्यांचा, टाकून दिलेल्या मातीची भांडी, लाकडी पेटीत, अन्नाचे डबे, पिठाच्या पिशव्या इ. गोष्टींचा उपयोग करता येईल.

शालेय पोषण बागेत पिकलेल्या भाजीपाला, फळे इत्यादीचे त्यांच्या विविध भागांसह (जसे देठे, लवकी, भोपळा, पाने, पुदिना, कोथिंबीर, पालक, फूल, भोपळा, फुले, मोरिंगा) भाजीपाल्याच्या साली (लवकी, भोपळा, दोडकी) मध्यान्ह आहारात शिजवल्या जाऊ शकतात.

शालेय पोषण बाग स्थापन करण्यासाठी राज्य शासनाने या योजनेचे कृषी विज्ञान केंद्र, कृषी उद्यान विद्या विभाग तसेच अन्न व पोषण मंडळ राज्य कृषी विद्यापीठ इत्यादी सोबत एककेंद्रीकरण करून सहाय्य घेण्यात यावे.

मध्यान्ह भोजन योजनेमध्ये असलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांमध्ये असलेल्या अतिरिक्त तरतुदी (flexi fund) चा उपयोग रुपये 5000/- प्रतिशाळा याप्रमाणे शालेय पोषण आहार बाग तयार करण्याकरिता बियाणे खरेदी, खते तसेच उपकरणाच्या खरेदी करता करण्यात यावा ही तरतूद राज्य शासन व केंद्र शासन यांची संयुक्त तरतूद असेल तसेच सदर योजनेच्या अंमलबजावणी करिता अंशतः बदल करण्याचे अधिकार जिल्हास्तरीय समितीकडे असतील. या समितीचे अध्यक्ष जिल्हा न्यायाधीश असतील ही समिती शाळेच्या गरजेनुसार प्रति पोषण बाग रुपये पाच हजार याप्रमाणे तरतूद देऊ शकेल. या बागेकरिता बियाणे, रोपे पुरविण्याचे काम कृषी विभाग किंवा उद्यान विद्या विभाग करेल. राज्यशासन यांकरिता (म.न.रे.गा.) चे सहाय्य खालील कामे जसे संरक्षक भिंत उभारणे, तसेच मैदान सपाटीकरण करणे यांकरिता घेऊ शकते. याकरिता असलेल्या मुख्य आराखड्यानुसार कार्यक्रम अंमलबजावणीच्या सूचना

आर्थिक वर्ष 2019-20 करिता ग्रामीण विकास मंत्रालयातर्फे निर्गमित करण्यात आले आहेत. या उपक्रमाचे फोटो अहवाल MDM-MIS या पोर्टलवर प्रत्येक तिमाहीमध्ये अपलोड करता येईल.

### तिथी भोजन :

शालेय विद्यार्थ्यांना अतिरिक्त पोषण पुरविण्याकरिता राज्य व केंद्रशासित प्रदेशांमध्ये, 'तिथी भोजन' हा उपक्रम सुरू करण्यात आलेला आहे. या उपक्रमांतर्गत शालेय विद्यार्थ्यांना विशेष दिवस जसे सण, वाढदिवस लग्नसमारंभ तसेच राष्ट्रीय सण या दिवसांमध्ये पूर्ण भोजन किंवा अतिरिक्त पदार्थ पुरविण्यात येतात. परंतु, 'तिथी भोजन' हे मध्यान्ह भोजनात पर्याय नसून मध्यान्ह भोजनासोबत पूरक म्हणून देण्यात यावेत. याकरिताच्या स्वयं स्पष्ट सूचना याआधीच मानव संसाधन विकास मंत्रालयाने निर्गमित केल्या आहेत.

'तिथी भोजन' ही संकल्पना काही राज्य तसेच केंद्रशासित प्रदेशांमध्ये वेगवेगळ्या नावाने सुरु आहेत. उदाहरणार्थ आसाम मध्ये (संप्रिती भोजन), आंध्र प्रदेशामध्ये (विंदू भोजनम) दादरा आणि नगर–हवेली (तिथी भोजन), दमण–दीव व गुजराथ (तिथी भोजन), हरियाणा (बेटी का जन्मदिन), कर्नाटक (रोलगी नाड निक), मध्य प्रदेश व महाराष्ट्र (स्नेहभोजन), चंदिगढ (तिथी भोजन), पदुचेरी (अन्नदानम), पंजाब (प्रीती भोजन), राजस्थान (उत्सव भोज), तामिळनाडू (नाले वृंद) तसेच उत्तराखंडमध्ये (विशेष भोज) इत्यादी उपक्रम सुरू आहेत.

### आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयासोबत अभिसरण :

सदर योजनेचे उपक्रमाचे आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालया सोबत MDM मधील आरोग्य व पोषण या घटकांकरीता अभिसरण करण्यात आलेले आहे.

1. ज्यामध्ये इयत्ता पहिली ते आठवीमध्ये शिकणाऱ्या तसेच 6 ते 14 वर्षे वयोगटात असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीकरिता राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत (RBSR) आरोग्य तपासणीचा कार्यक्रम राज्यशासन तसेच केंद्रशासित प्रदेशांनी राबवावा.
2. आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्रालयाकडून Micronutrients Suppliment पुरविण्यात येतात. तसेच (WIFS) कार्यक्रमाअंतर्गत आयर्न आणि फॉलिक ॲसिड गोळ्यांचा पुरवठा विद्यार्थ्यांना करण्यात येतो.
3. राष्ट्रीय जंतनाशक दिवसानिमित्त वर्षातून दोन वेळा जंतनाशक औषधे मुलांना देण्यात येतात.

### अन्न शिजविणे स्पर्धा :

वर्ष 2018-19 करिता अन्न शिजविण्याच्या स्पर्धा आयोजित करणे हा मध्यान्ह भोजनाचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. या स्पर्धे चे आयोजन मध्यान्ह भोजन शिजविणारे तसेच मदतनीस यांना चांगल्या पाककृती बनविण्यासाठी प्रेरित करण्याकरिता; तसेच पूर्ण भाजी वापरण्यास संबंधित जसे पाने, देठ, साली इत्यादीच्या साहित्यातून चविष्ट व पोषक अन्न तयार करण्याची सवय विकसित करण्याकरिता तसेच समाज सहभाग वाढविण्याकरिता ही सदर स्पर्धा महत्त्वपूर्ण आहे. या स्पर्धेकरिता परीक्षक म्हणून या योजनेच्या लाभार्थींना उदा. प्राथमिक शाळेतील एक विद्यार्थी, पूर्व माध्यमिक शाळेतील एक विद्यार्थी काम बघतील. यासोबतच पोषक तज्ज्ञाची मदत सद्धा या परीक्षांकरिता घेण्यात येईल. विजेत्या स्पर्धकांना योग्य पारितोषिके सन्मानपूर्वक देण्यात येतील.

प्रत्येकी सहा प्रशिक्षणार्थींचा एक गट तयार करून त्यांना या योजना अंमलबजावणीसाठीच्या मुख्य अडचणी, योजनांमधील अडचणी व त्यावरील उपाययोजना यासंदर्भात चर्चा घडवून आणावी.

### समग्र शिक्षा अंतर्गत MDM तसेच काही यशोगाथा :

समग्र शिक्षा, MDM योजने अंतर्गत प्राप्त तरतुदींचा जास्तीत जास्त चांगला उपयोग होण्याकरिता मुख्याध्यापक तसेच शिक्षकांनी शालेय स्तरावर नियोजन करावे. तसेच या सर्व योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी करता शालेय उपक्रमाचे पुनरावलोकन करण्यात यावे. तसेच या योजना शालेय स्तरावरील उपक्रम जसे (eco club, youth club) यांनाही कशा प्रकारे सहाय्य ठरतील याकडे लक्ष देऊन नियोजन करणे अपेक्षित आहे.

❑❑❑